18 Nov 2026_Layout 1 11/17/2026 10:34 PM Page 1

नोव्हेंबर/November
बुधवार/Wednesday
दि.१८/Dt: 18
२०२६/2026

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

सत्य | निष्पक्ष | निर्भीड | सर्वसमावेशक

आजचा अंक ६ पाने Pages 6

किंमत ३ रूपये Price 3 rupees

Jagmitra2010@gmail.com

● मा.संपादक : कृष्णा कडबाने 7030908787 ● निवासी संपादक : मकरंद जहागीरदार 9422216061, 9371591760 ● कार्यकारी संपादक : शेख बिलाल 9422404740

www.jagmitra.com

● बीड/Beed ● वर्ष १७ वे/Year 17 ● अंक २७/Issue 27 ● आरएनआय नं.एमएचएमएआर/२०११/३८८१४ /RNI.No.MAHMAR/2011/38814

गेवराईत गुन्हा मग बीडच्या भ्रष्ट अधिकाऱ्यांना अभय का?

उच्चदाब वाहिनी गायब प्रकरणी दोषी सहाय्यक अभियंता व एजन्सीला वाचवणारे आका कोण?

वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष्मीदर्शनापुढे टेकले गुडघे; चौकशी अहवाल दडपून दोषींना पाठीशी घालणाऱ्यांची दैनिक जगमित्र पुराव्यानिशी पोलखोल करणार!

महावितरणचा दुटप्पीपणा! देवपिंप्रीत गुन्हा दाखल, तर बीड शहरातील हायव्होल्टेज घोटाळ्याचा अहवाल कोणाच्या खिशात?

गेवराईत कायद्याचा बडगा, मग बीडमध्ये मलिद्याची मखलाशी का? उच्चदाब वाहिनी गायब प्रकरणी दोषी अभियंता व एजन्सीला पाठीशी घालणारे वरिष्ठ अधिकारी रडारवर!



चौकशीत दोषी आढळूनही गुन्हा नाहीच! किती पैसे घेऊन बीडमधील त्या सहाय्यक अभियंत्याला वाचवले? दैनिक जगमित्र करणार महापोलखोल!

पुढील भागात पुराव्यानिशी पोलखोल!

गेवराईच्या धर्तीवर बीड शहरातील उच्चदाब वाहिनी स्थलांतर आणि गायब प्रकरणी दोषी सहाय्यक अभियंता व एजन्सीवर तात्काळ गुन्हा दाखल करावा, अशी जोरदार मागणी होत आहे. अन्यथा, कोण किती पैसे खाऊन हा चौकशी अहवाल दाबून बसले आहेत आणि या भ्रष्ट साखळीला कोणाचे अभय आहे, याचा संपूर्ण लेखाजोखा आणि खळबळजनक पुरावे दैनिक जगमित्र पुढील भागात जनतेसमोर मांडून या बड्या अधिकाऱ्यांची वस्त्रहरण करणारी पोलखोल करणार आहे!

बीड/जगमित्र न्यूज

महावितरणच्या नियम आणि कायद्यांना थेट केराची टोपली दाखवत गेवराई तालुक्यातील देवपिंप्री शिवारात तब्बल १८ उच्चदाब विद्युत खांब, २ रोहित्रे (डीपी) आणि ७ पोल परस्पर उखडून दुसरीकडे हलवल्याचा महाघोटाळा उघडकीस आला आहे. याप्रकरणी महावितरणने धडक कारवाई करत सेल रे पॉवर लिमिटेड कंपनी आणि अमोल राठोड यांच्याविरोधात थेट गुन्हा दाखल केला. मात्र, दुसरीकडे बीड शहरातही अशाच प्रकारे उच्चदाब वाहिनीचे बेकायदेशीर स्थलांतर करून काही वाहिनी थेट गायब करण्याचा प्रताप घडला असताना, चौकशी समितीने दोषी ठरवूनही संबंधित सहाय्यक अभियंता आणि एजन्सीवर अद्याप गुन्हा दाखल का झाला नाही? असा संतप्त सवाल आता उपस्थित होत आहे.बीड शहरातील काही प्रभागांमधील उच्चदाब वाहिनी नियमबाह्य पद्धतीने स्थलांतरित करण्यात आली, तर काही ठिकाणची उच्चदाब वाहिनी संबंधित एजन्सीने परस्पर गायब करून महावितरणच्या मालमत्तेवर डल्ला मारला. या गंभीर प्रकरणाची तक्रार झाल्यानंतर प्रशासनाने दिखाव्यासाठी चौकशी समिती नेमली. या समितीच्या अहवालात संबंधित सहाय्यक अभियंता आणि एजन्सी थेट दोषी आढळले आहेत. असे असतानाही त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्यास महावितरणचे वरिष्ठ अधिकारी जाणीवपूर्वक टाळाटाळ करत आहेत.गेवराई तालुक्यात जर महावितरणची यंत्रणा परस्पर हलवल्याप्रकरणी तात्काळ गुन्हा दाखल होतो, तर बीड शहरातील या महाघोटाळ्याला वेगळा न्याय का? असा प्रश्न सर्वसामान्य नागरिक विचारत आहेत. चौकशी अहवालात स्पष्ट ठपका ठेवलेला असतानाही फाईल दडपून दोषी सहाय्यक अभियंता आणि एजन्सीला पाठीशी घालण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी नेमके किती वजन घेतले? हा संपूर्ण व्यवहार कसा झाला? याची कुणकुण आता लागली आहे.

ना.पंकजाताई मुंडेंच्या हस्ते देशातील पहिल्या सल्फर डायऑक्साइड उत्सर्जन व्यापार योजनेचे उद्घाटन

पर्यावरण संरक्षण आणि आर्थिक विकासाचा समतोल साधणारे उपाय विकसित करणे ही शासनाची भूमिका

मुंबई/प्रतिनिधी

राज्यातील हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने देशातील पहिल्या सल्फर डायऑक्साइड उत्सर्जन व्यापार योजनेची घोषणा केली आहे. एमिशन्स मार्केट एक्सीलरेटरच्या सहकार्याने प्रदूषण नियंत्रण मंडळ ही योजना राबविणार असून, त्यामुळे राज्यातील सुमारे १३ कोटी नागरिकांना सुधारित हवेच्या गुणवत्तेचा लाभ मिळण्याची अपेक्षा आहे. पर्यावरण संरक्षण आणि आर्थिक विकासाचा समतोल साधणारे उपाय उद्योग क्षेत्राच्या सहकार्याने विकसित करणे ही शासनाची भूमिका असल्याचे राज्याच्या



पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजाताई मुंडे यांनी सांगितले.

मुंबई येथे आयोजित कार्यक्रमात मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत या योजनेची घोषणा करण्यात आली. नागरीकरण, तंत्रज्ञान आणि औद्योगिक विकासाचा वेग वाढत असताना प्रदूषणाची आव्हानेही वाढत आहेत. औद्योगिक प्रदूषणाचे प्रभावी निरीक्षण आणि प्रशासकीय यंत्रणा अधिक सक्षम करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेसह आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याची आवश्यकता असल्याचे पंकजाताई मुंडे यांनी स्पष्ट केले.

शिकागो विद्यापीठाचे सहकार्य

एमिशन्स मार्केट एक्सीलरेटर ही शिकागो विद्यापीठाच्या एनर्जी पॉलिसी इन्स्टिट्यूट आणि अब्दुल लतीफ जमील पॉव्हर्टी ॲक्शन लॅब यांच्या संयुक्त भागीदारीतून कार्यरत असलेली जागतिक संस्था आहे. या संस्थेच्या सहकार्याने महाराष्ट्र प्रदूषण (पान २ वर)

ओव्हरलोड खडी वाहतुकीचा धुमाकूळ; अनधिकृत रस्त्यांमुळे अपघातांचा धोका वाढला!

धारूर/अतुल शिनगारे

खामगाव-पंढरपूर राष्ट्रीय महामार्गावरील धारूर घाटात ओव्हरलोड खडी वाहतूक करणाऱ्या वाहनचालकांची मनमानी सुरू असल्याचे चित्र दिसत आहे. क्षमतेपेक्षा अधिक खडी भरून अवजड वाहने भरधाव वेगाने घाटातून धावत असल्याने इतर वाहनधारकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेष म्हणजे, घाट परिसरात अनधिकृतपणे पर्यायी रस्ते तयार करून या रस्त्यांवरून ओव्हरलोड वाहने नेली जात असल्याचा प्रकारही समोर येत आहे.

या अवैध रस्त्यांवरून वाहने जाताना त्यातील खडी रस्त्यावर पडत असून, त्यामुळे दुचाकीस्वार आणि चारचाकी वाहनधारकांसाठी अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. यापूर्वीही या परिसरात खडी रस्त्यावर पसरल्याने अनेक लहान-मोठे अपघात घडल्याच्या घटना घडल्या आहेत. तरीही संबंधित यंत्रणांकडून ठोस कारवाई होत नसल्याने वाहनधारकांमध्ये नाराजी व्यक्त



होत आहे.

धारूर घाटात अनधिकृत रस्ते तयार करण्याची परवानगी कोणी दिली? ओव्हरलोड वाहनांची तपासणी कोण करणार? क्षमतेपेक्षा अधिक खडी वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्याची जबाबदारी कोणाची? असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. खडी क्रेशर मालकांकडून आमचे कुणीही वाकडे करू शकत नाही, अशा स्वरूपाच्या चर्चा (पान २ वर)

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांना पुण्यतिथीनिमित्त परळीत अभिवादन

परळी वैजनाथ/प्रतिनिधी

हिंदुहृदयसम्राट, शिवसेनाप्रमुख स्वर्गीय वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्या पुण्यतिथीनिमित्त परळी वैजनाथ येथील शिवसेना कार्यालयात त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी शिवसेना उपजिल्हाप्रमुख नारायणराव सातपुते, शिवसेना तालुकाप्रमुख भोजराज पालीवाल, शिवसेना शहरप्रमुख राजेश विभुते, तालुका सचिव प्रकाश साळुंखे, उपशहरप्रमुख विशाल गावंडे, सर्कलप्रमुख सोनवणे यांच्यासह इतर शिवसैनिक उपस्थित होते.



यावेळी उपस्थित शिवसैनिकांनी बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतींना अभिवादन करून त्यांच्या विचारांना उजाळा दिला.

रामपुरी खु.येथील पाणी पुरवठा सुरळीत करण्यासाठी दुरुस्तीच्या नावाने हाजारो रुपये खर्च करुन ही गावकरी पाण्यावाचुन वंचित

पाथरी/आवडाजी ढवळे

पाथरी तालुक्यातील रामपुरी खु.येथील पाणी पुरवठा सुरळीत करण्यासाठी दुरुस्तीच्या नावाखाली हजारो रुपये खर्च करुण आज ही गावकरी पाण्या वाचुन वंचित आसल्याचा आरोप आखिल भारतीय ग्राहक पंचायत चे पाथरी तालुका अध्यक्ष शाम रणेर यांनी एका निवेदनाद्वारे केला आसुन सदर निवेदनात पाण्यासाठी धरणे आंदोलन करण्याचा इंशारा ही त्यांनी प्रशासनास दिला आहे

सविस्तर वृत्त आसे कि पाथरी तालुक्यातील रामपुरी खु.येथील गावचे रहीवासी व आखिल भारतीय ग्राहक पंचायत चे पाथरी तालुका अध्यक्ष शाम रणेर यांनी आपल्या गावातील नागरीकास मुबलक शुध्द पाणी मिळावे या कडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी पाथरी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांना काल दि.१७/११/२०२६ रोजी एक पत्र दिले आसुन त्या पत्रा मध्ये आसे नमुद करण्यात आले आहे कि रामपुरी खु.या गावाला पाणी पुरवठा करण्यासाठी करोडो रुपये खर्च करण्यात आला आहे परंतु या वर काम करणाऱ्या यंत्रनेच्या व देखभाल दुरुस्ती करणारी यंत्रना यांच्या अक्षम्य कारभारा मुळे रामपुरी खु.गावातील नागरीक पाण्या पासुन वंचित आहेत पाणी साठवण्यासाठी दोन जलकुंभ आसतांना ही केवळ पाणी भरुण घेण्या अभावी गाव तहानलेलेच आहे जल कुंभात पाणी पुर्वठा करणाऱ्या पाईपच्या कनेक्शन मधिल तांत्रीक चुका मुळे ५०%पेक्षा जास्त पाणी वायाजात आसल्याने जलकुंभ भरल्या जात नाहीत या वर दुरुस्तीच्या नावा खाली ग्रामपंचायतने आनेक वेळा हजारो रुपये खर्च कल्याचे दाखवले आहे परंतु छोटीसी हि दुरुस्ती झालेली नाही आसा आरोप शाम रणेर यांनी गटविकास अधिकारी पंचायत समिती पाथरी यांच्या कडे सादर केलेल्या निवेदनात कराण्यात आला आसुन पुढे सदरील निवेदनात साहेबांनी त्वरीत लक्ष देवुन पाणी प्रश्न मिटवावा अन्यथा सोमवार दि.२३ नोहेम्बंर रोजी गावातील महिला आपल्या कक्षात धरणे आंदोलन करतील आसा इंशारा सदरील निवेदनाद्वारे शाम रणेर यांनी प्रशासनास दिला आहे

आता संबधीत जबाबदार प्रशासन कोनती भुमिका घेणार या कडे ग्रामस्तांचे लक्ष लागले आहे.

अखेर लोणी फाटा ते गुंज रस्त्याच्या कामाला सुरुवात; शिवसेनेच्या उपोषणाच्या इशाऱ्याला यश

पाथरी/आवडाजी ढवळे

लोणी बु. फाटा ते गुंजखुर्द रस्त्याचे काम तात्काळ पूर्ण करण्यात यावे, अन्यथा शिवसेनेच्या वतीने आमरण उपोषण करण्यात येईल, असा इशारा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे जिल्हाप्रमुख आणि लोणी बु. ग्रामस्थांनी दिला होता. या इशाऱ्याची प्रशासनाने दखल घेत अखेर या रस्त्याच्या कामाला प्रत्यक्ष सुरुवात झाली आहे. लोणी ते गुंज हा रस्ता गेल्या अनेक महिन्यांपासून अत्यंत दयनीय अवस्थेत होता. ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडले असून रस्त्यावरून प्रवास करणे नागरिकांना, शेतकऱ्यांना, विद्यार्थ्यांना आणि वाहनधारकांना जीवघेणे झाले होते. रुग्णांना वेळेत दवाखान्यात पोहोचवणेही अवघड झाले होते. या पार्श्वभूमीवर शिवसेना जिल्हाप्रमुख रवींद्र धर्मे, माजी जिल्हा परिषद सदस्य रणजित गिराम , यांच्यासह लोणी बु. ग्रामस्थांनी सार्वजनिक बांधकाम विभागाला निवेदन देऊन १५ नोव्हेंबर २०२६ पर्यंत रस्त्याचे काम सुरू न झाल्यास आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला होता. या इशाऱ्यानंतर प्रशासन खडबडून जागे झाले असून, सध्या लोणी फाटा ते गुंज रस्त्यावर



खडीकरणाचे काम जोरात सुरू आहे. मजूर, जेसीबी आणि डांबरीकरणाची यंत्रणा रस्त्यावर दाखल झाली असून कामाला गती आली आहे. रस्त्याचे काम सुरू झाल्याने लोणी, गुंज, कानसूर, उमरा, गौडगांव , आंधपुरी आदी गावातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. मात्र काम दर्जेदार आणि वेळेत पूर्ण व्हावे, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.व जिल्हाप्रमुख रविंद्र धर्मे व रंजीत गिराम यांचे आभार मानले आहेत. आंदोलनाशिवाय न्याय मिळत नाही, हेच पुन्हा एकदा सिद्ध झाले, अशी प्रतिक्रिया ग्रामस्थांनी व्यक्त केली.

रामोड यांच्या नाकर्तेपनाने पात्रुड, गंगामसला येथे गुटखा, मटका, पत्याचे क्लबवाले फोफावले

पि आय रामोडचा धाक संपल्याने नंबर दोनवाल्यांचा विजय

माजलगाव/प्रतिनिधी

माजलगाव ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक विजय रामोड यांनी पदभार स्वीकारल्यापासून कायदा म्हणजे नेमके काय असते, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. दोन नंबरवाल्यांनी नको तेवढे डोके वर काढले असून महिला, मुलींवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली आहे. रोज चोऱ्या, वाटमारीच्या घटना घडत असताना माजलगाव ग्रामीण पोलीस नेमके काय करत आहेत? असा प्रश्न सर्वसामान्यांमधून उपस्थित होत असून ग्रामीण पोलीस दलाच्या नाकर्तेपणावर जनतेच्या मुखातून टीका होत आहे.

माजलगाव ग्रामिण पोलीस स्टेशन च्या हदी मध्ये पात्रुड , गंगामसला येथे राजरोसपणे मटका ,गुटखा , पत्याचे क्लब दारू या सह अवैध धंदे बोकाळले असुन हप्तेखोरीमुळे अवैध धंद्यावाल्यावर कारवाही करण्याची हिम्मत ग्रामीण पोलिसांमध्ये आहे का? असा संतप्त सवाल नागरिकात उपस्थित होत आहे. सध्या कायदा व सुव्यवस्थेचे तीनतेरा वाजले



असून, तालुक्यातील पात्रूड , गंगामसला परिसरात अवैध पत्त्याचे क्लब , गुटखा, मटका अवैध धंद्यांचे प्रमाण वाढत चालले आहे. माजलगाव तालुक्या भरात अनेक ठिकाणी अवैध धंदे खुलेआम सुरू असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. यामुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अवैध धंद्यांवर कारवाई करण्याची जबाबदारी पोलिस प्रशासनाची असताना संबंधित ठिकाणी मात्र ठोस कारवाई होताना दिसत नाही. त्यामुळे अवैध धंदे करणाऱ्यांचे मनोबल वाढले आहे. कायद्याचा धाक राहिला नसल्याने अनेक (पान २ वर)

18 Nov 2026 page 2_Layout 1 11/17/2026 11:13 PM Page 1

तुळजापूर खून प्रकरण : पोलिसांचे म्हणणे न घेता, न्यायाधीशाकडून जामीन कसा मंजूर?

एआयएमआयएमचे प्रदेशाध्यक्ष इम्तियाज जलील यांचा सवाल

धाराशिव/प्रतिनिधी

तुळजापूर शहरातील युवकाच्या हत्येप्रकरणी एआयएमआयएमचे प्रदेशाध्यक्ष तथा माजी खासदार इम्तियाज जलील यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक यांची मंगळवारी (दि.१७) भेट घेतली. त्यानंतर त्यांनी पत्रकार परिषद घेत संबंधित पोलीस ठाण्यातील अधिकारी, कर्मचारी यांच्यासह न्यायालयावरही ताशेरे ओढले. युवकाच्या हत्येप्रकरणी न्यायालयाकडूनही पोलिसांचे म्हणणे न घेता जामीन न्यायाधीशांनी कसा मंजूर केला असा प्रश्न उपस्थित केला.

पुढे बोलताना इम्तियाज जलील म्हणाले की, तुळजापूर शहरातील झालेल्या युवकांची हत्या ही अतिशय निंदनीय घटना आहे. सामान्य कुटूंबातील युवकाला बेदम मारहाण झाली. त्यात एकाचा मृत्यू झाला तर सुदेवाने एक युवक वाचला. ही दोन्ही कुटूंबे सध्या हे भितीच्या वातावरणात वागत आहेत. त्यांच्या कुटूंबियांना पोलिसांनी संरक्षण देण्याची गरज



आहे. मात्र या कटूंबाला न्याय मिळत नाही. या कुटुंबीयांना न्याय मिळवून देण्यासाठी या जिल्ह्यातील खासदार, आमदार, पालकमंत्री हे अपयशी ठरले आहेत. त्यामुळे मला छत्रपती संभाजीनगरहून या कुटूंबाला न्याय देण्यासाठी यावे लागते हे यावरुन स्पष्ट होते. हत्या करणारे आरोपी हे अनेक आहेत, हे व्हीडिओद्वारे दिसून येते. मात्र पोलिसांनी केवळ तिघांना अटक केली. त्यातील अनेक मुख्य आरोपी फरार आहेत. अटक करण्यात आलेल्या आरोपींवरदेखील कलम लावताना पोलिसांनी दुर्लक्ष केल्याचे दिसून येते. त्यामुळेच आरोपींची तात्काळ सुटका झाली आहे. विशेष म्हणजे न्यायाधिशांकडून देखील पोलिसांचे म्हणणे न घेता या आरोपींना जामीन कसा मंजूर केला? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. त्यामुळे या कुटूंबांना न्याय देण्यासाठी आपण पोलीस अधीक्षकांना भेटले आहे, विविध मागण्यांचे निवेदन दिले असून त्यांना तुमच्यावर कोणाचा राजकीय दबाब आहे का, राहिलेल्या आरोपीवर किती दिवसात कारवाई करणार अशी विचारणा केली आहे. यावेळी त्यांच्याकडून कोणाचा दबाब नाही, योग्य कारवाई करण्याचे पोलिसांनी आश्वासन दिले आहे. यानंतरही या कुटूंबांना न्याय मिळाला नाही, तर आमची यापुढील वेगळी भूमिका असेल, असे त्यांनी सांगितले. यावेळभ एआयएमआयएमचे जिल्हाध्यक्ष शहबाज काझी, यांच्यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

धाराशिव मध्ये न्यायालयीन कर्मचारी संपावर



धाराशिव/प्रतिनिधी

समान काम समान वेतन या धरतीवर उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्याप्रमाणे सुधारित वेतनश्रेणी लागू करावी या प्रमुख मागणीसाठी राज्यातील न्यायालयीन कर्मचारी आज दिनांक १७ नोव्हेंबर पासून बेमुदत संपावर आहेत. धाराशिव जिल्हा न्यायालयाच्या परिसरात कर्मचाऱ्यांनी उस्फूर्तपणे आंदोलनात सहभाग नोंदवला.

सन २०२३ पर्यंत उच्च न्यायालय व जिल्हा न्यायालयातील कर्मचाऱ्यांचे वेतन समान होते परंतु नंतर मात्र उच्च न्यायालयाच्या कर्मचाऱ्यांसाठी सुधारित वेतन श्रेणीचा शासन निर्णय काढून जिल्हा व तालुका न्यायालयीन कर्मचाऱ्यांसाठी दुजाभाव करण्यात आला.

शासन दरबारी हॅपी जानेवारी २०२५ रोजी सुधारित वेतनश्रेणीचा प्रस्ताव उच्च न्यायालयामार्फत शासनाकडे सादर केलेला असून अद्याप कसलीही कार्यवाही झालेली नसल्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये संताप व्यक्त करण्यात येत आहे. या आंदोलनामध्ये जिल्हा न्यायालयीन कर्मचारी संघटना वर्ग ३, जिल्हा न्यायालय बेलीफ कर्मचारी संघटना, जिल्हा न्यायालयीन चतुर्थ श्रेणी कर्मचारी संघटना सहभागी झाल्या होत्या. आपल्या न्याय मागणीसाठी कर्मचाऱ्यांनी घोषणाबाजी करत लक्षवेधी आंदोलन केले.

आयटीआय तासिका निदेशकांच्या मागण्यांसाठी शासन दरबारी पाठपुरावा करणार आ.डॉ.प्रतापसिंह पाटील

मुंबईतील आझाद मैदानावर आंदोलनस्थळी भेट देत तासिका निदेशकांशी साधला संवाद; नियमितीकरण, सन्मानजनक मानधन आणि सेवासुरक्षेच्या मागण्यांना जाणून घेतले

धाराशिव/प्रतिनिधी

राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये अनेक वर्षांपासून तासिका तत्त्वावर सेवा बजावणाऱ्या निदेशकांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी मुंबईतील आझाद मैदानावर सुरू असलेल्या आंदोलनस्थळी मराठवाडा पदवीधर मतदारसंघाचे आमदार डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी भेट देऊन आंदोलकांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी तासिका निदेशकांच्या समस्या, अडचणी आणि प्रलंबित मागण्या सविस्तरपणे जाणून घेतल्या.

अनेक वर्षांपासून औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये तासिका तत्त्वावर कार्यरत असलेले निदेशक विद्यार्थ्यांना तांत्रिक व व्यावसायिक प्रशिक्षण देण्याचे महत्त्वपूर्ण काम करत आहेत. कुशल आणि प्रशिक्षित मनुष्यबळ निर्माण करण्यामध्ये त्यांचे योगदान मोलाचे आहे. मात्र, दीर्घकाळ सेवा करूनही त्यांना सेवासुरक्षा, नियमितीकरण आणि आर्थिक स्थैर्याबाबत अनेक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे आंदोलकांनी आमदार डॉ. पाटील यांच्या निदर्शनास आणून दिले.

यावेळी आंदोलकांनी सेवेत नियमितीकरण करणे, अनेक वर्षांच्या अनुभवाला योग्य



मान्यता देणे, सन्मानजनक मासिक मानधन निश्चित करणे, सेवेत स्थैर्य निर्माण करणे तसेच सेवासुरक्षा प्रदान करणे आदी प्रमुख मागण्या मांडल्या. या मागण्यांसोबतच तासिका निदेशकांच्या सेवेशी संबंधित इतर प्रश्नांवरही चर्चा करण्यात आली.


यावेळी आमदार डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी निदेशकांच्या समस्या समजून घेत त्यांच्या न्याय्य मागण्यांसंदर्भात शासनस्तरावर सातत्याने पाठपुरावा करण्याचा विश्वास दिला. कौशल्य विकास आणि व्यावसायिक शिक्षणाच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या तासिका निदेशकांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष होता कामा नये. त्यांच्या प्रदीर्घ अनुभवाचा आणि सेवेचा योग्य सन्मान होणे आवश्यक आहे, अशी भूमिका त्यांनी मांडली.

तासिका निदेशकांच्या श्रमाला सन्मान, अनुभवाला योग्य न्याय आणि त्यांच्या भविष्याला सुरक्षितता मिळाली पाहिजे. त्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी शासनस्तरावर पाठपुरावा करून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आपण प्रयत्नशील राहू, अशी ग्वाही आमदार डॉ. पाटील यांनी यावेळी दिली.

या भेटीमुळे आंदोलनकर्त्या तासिका निदेशकांच्या प्रलंबित प्रश्नांना लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून शासनदरबारी मांडण्याचा मार्ग उपलब्ध होणार असल्याची अपेक्षा आंदोलकांनी व्यक्त केली.

वैद्यनाथ साखर कारखान्याचे जेष्ठ संचालक पांडुरंगराव फड यांचे निधन

परळी वैजनाथ/प्रतिनिधी



वैद्यनाथ सहकारी साखर कारखान्याचे जेष्ठ संचालक, भाजपाचे नेते पांडुरंगराव (दादा) कोंडिबा फड यांचे आज मंगळवार दि. १७ नोव्हेंबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ९० वर्षे होते. कै. पांडुरंगराव फड हे सुरुवातीपासून लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांचे सहकारी होते. वैद्यनाथ साखर कारखान्याचे सुरुवातीपासून ते संचालक होते. अतिशय धार्मिक आणि मनमिळावू स्वभावाने त्यांना पंचक्रोशीत ओळखले जात होते. आडत व्यापारी म्हणूनही त्यांची ओळख होती. त्यांनी अनेक पदे भूषविली तरी अभिमान बाळगला नाही. शेवटपर्यंत ते लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब आणि त्यांच्या कुटुंबाशी एकनिष्ठ राहिले. आज मंगळवार दिनांक १७ नोव्हेंबर रोजी रात्री कनेरवाडी येथील निवासस्थानी वृध्दापकाळाने त्यांचे निधन झाले.

आज कन्हेरवाडीत अंत्यसंस्कार

कै. पांडुरंगराव फड यांच्या पार्थिवावर उद्या बुधवार दि. १८ नोव्हेंबर रोजी सकाळी ९.३० वाजता कनेरवाडी येथे अंत्यसंस्कार केले जाणार आहेत. कै. पांडुरंगराव फड यांच्या पश्चात व्यापारी भागवत फड, कनेरवाडीचे माजी उपसरपंच रामहरी फड ही दोन मुले, दोन मुली, सुना, जावई, नातवंडे, पतवंडे असा भरगच्च परिवार अहे. महावितरणचे कॉन्ट्रॅक्टर प्रवीण फड यांचे ते आजोबा होत. फड परिवाराच्या दुःखात दै.जगमित्र परिवार सहभागी आहे.

लोहगाव केसरी बैलगाडा स्पर्धेस उत्स्फूर्त प्रतिसाद...११२ स्पर्धकांचा सहभाग!

लोहगाव/निजाम शेख

तुळजापूर तालुक्यातील मौजे लोहगाव येथे दीपावली उत्सवानिमित्त धारकरी बैलगाडा संघटना, लोहगाव यांच्या वतीने प्रथमच भव्य लोहगाव केसरी बैलगाडा शर्यतीचे आयोजन रविवार दि. १५ रोजी आयोजित करण्यात आली होती.करण्यात आले होते. या स्पर्धेत तब्बल ११२ स्पर्धकांनी सहभाग नोंदवला. धाराशिवसह लातूर, बीड, अंबाजोगाई, सोलापूर, माळशिरस, अक्कलकोट, पंढरपूर आदी विविध



भागांतून बैलगाडा शौकिनांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेच्या अंतिम फेरीत रामलिंग प्रसन्न राणा ग्रुपच्या राणा आणि युवांश देवांश आबा गाढवे यांच्या पक्षा या बैलजोडीने दमदार कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला. तर संत बाळूमामा प्रसन्न ग्रुप, आंबेजवळगे यांच्या सर्जा आणि आई येडेश्वरी ग्रुपच्या पिल्या यांनी द्वितीय क्रमांक मिळवला. साक्षी शिंदे, माजलगाव यांच्या सुंदर ११ आणि तेलगावच्या राजा यांनी तृतीय क्रमांक पटकावला. विजेत्यांना देण्यात आलेली पारितोषिके - प्रथम क्रमांक ३१ हजार रुपये ,द्वितीय क्रमांक २१ हजार रुपये- तृतीय क्रमांक १५ हजार रुपये, चौथे क्रमांक ११ हजार रुपये, पाचवे क्रमांक ७ हजार रुपये, सहावे क्रमांक ५ हजार रुपयांचे बक्षीस व सर्व विजेत्या स्पर्धकांना रोख पारितोषिक आणि सन्मानचिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. या स्पर्धेमुळे लोहगाव परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर परीसरात नागरीक बैलगाडा शैकीन मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान १ वरून....

ना.पंकजाताई

नियंत्रण मंडळ ही उत्सर्जन व्यापार योजना कार्यान्वित करणार आहे. योजनेअंतर्गत सहभागी औद्योगिक प्रकल्पांना निश्चित मर्यादेनुसार सल्फर डायऑक्साइड उत्सर्जन परवाने दिले जातील. कमी खर्चात उत्सर्जन घटवू शकणारे उद्योग अधिक कपात करून त्यांच्याकडील अतिरिक्त परवान्यांची विक्री करू शकतील, तर उत्सर्जन कपातीसाठी तुलनेने अधिक खर्च येणाऱ्या उद्योगांना हे परवाने खरेदी करता येतील. या बाजाराधारित व्यवस्थेमुळे उद्योगांना प्रदूषण कमी करण्यासाठी आर्थिक प्रोत्साहन मिळेल आणि औद्योगिक स्पर्धात्मकता कायम ठेवून प्रभावी उत्सर्जन कपात साधता येईल. योजनेसाठी आवश्यक अचूक आणि विश्वासार्ह उत्सर्जन आकडेवारी उपलब्ध करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने गेल्या काही वर्षांत आवश्यक यंत्रणा विकसित केली आहे. या माहितीच्या आधारे पर्यावरणीय धोरणांची प्रभावी आखणी आणि अंमलबजावणी केली जाणार आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश रामदास कदम यांनी ही योजना नावीन्यपूर्ण विचार आणि सामूहिक सहकार्याचे उत्तम उदाहरण असल्याचे सांगितले. उद्योगांना केवळ नियंत्रित करण्याऐवजी त्यांच्यासोबत प्रगती करण्याचा मंडळाचा दृष्टिकोन आहे. उद्योगांचा सक्रिय सहभाग तसेच शिकागो विद्यापीठ, एमिशन्स मार्केट एक्सीलरेटर आणि जे-पॅल यांसारख्या ज्ञानसहभागी संस्थांच्या सहकार्यामुळे हा उपक्रम साकार झाल्याचे त्यांनी नमूद केले. शिकागो विद्यापीठातील अर्थशास्त्राचे प्रतिष्ठित प्राध्यापक मिल्टन फ्रीडमन, एनर्जी पॉलिसी इन्स्टिट्यूटचे संचालक आणि एमिशन्स मार्केट एक्सीलरेटरचे सह-अध्यक्ष प्रा. मायकेल ग्रीनस्टोन यांनी बाजाराधारित योजनेमुळे औद्योगिक क्षेत्रावरील प्रदूषण नियंत्रणाचा खर्च कमी करतानाच उत्सर्जनात प्रभावी कपात करता येत असल्याचे संशोधनातून दिसून आल्याचे सांगितले.

सामंजस्य करार

याच कार्यक्रमात महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि युनिव्हर्सिटी ऑफ शिकागो ट्रस्ट यांनी पर्यावरणीय नियमन व औद्योगिक तपासणीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मशीन लर्निंगचा वापर करण्यासाठी स्वतंत्र सामंजस्य करार केला. एनर्जी पॉलिसी इन्स्टिट्यूट ॲट शिकागो युनिव्हर्सिटी इंडिया यांच्या माध्यमातून हा उपक्रम राबविला जाणार आहे. दोन्ही संस्था संयुक्तपणे कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित पर्यावरणीय तपासणी आराखडा विकसित करून त्याची प्रायोगिक तत्त्वावर अंमलबजावणी करतील. मंडळाकडील माहितीचे विश्लेषण करून पर्यावरणीय नियमांचे उल्लंघन होण्याची अधिक शक्यता असलेल्या उद्योगांची ओळख पटविण्यास ही प्रणाली मदत करेल. मंडळातील अधिकारी आणि क्षेत्रीय निरीक्षकांसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता, पर्यावरणीय माहितीचे विश्लेषण आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराबाबत प्रशिक्षण व ज्ञानविनिमय कार्यक्रमही आयोजित केले जातील. प्रायोगिक उपक्रमाच्या निष्कर्षांच्या आधारे ही प्रणाली संपूर्ण राज्यात विस्तारण्याबाबत निर्णय घेतला जाईल. यावेळी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश रामदास कदम तसेच शिकागो विद्यापीठातील अर्थशास्त्राचे प्राध्यापक मिल्टन फ्रीडमन, एनर्जी पॉलिसी इन्स्टिट्यूटचे संचालक आणि एमिशन्स मार्केट एक्सीलरेटरचे सह-अध्यक्ष प्रा. मायकेल ग्रीनस्टोन उपस्थित होते.

.....

धुमाकूळ

होत असल्याचेही नागरिकांकडून सांगितले जात आहे.

अपघात झाल्यानंतरच प्रशासन जागे होणार का?

तहसील प्रशासन, रस्ते विकास महामंडळ आणि प्रादेशिक परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांनी या प्रकाराची गांभीर्याने दखल घेण्याची गरज आहे. अनधिकृत रस्त्यांची तातडीने पाहणी करून ते बंद करावेत, ओव्हरलोड वाहनांवर दंडात्मक कारवाई करावी, भरधाव वाहतुकीला आळा घालावा तसेच रस्त्यावर पडणारी खडी तातडीने हटविण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी वाहनधारक आणि नागरिकांतून होत आहे.नागरिकांच्या जीवाशी खेळणाऱ्या या प्रकाराकडे संबंधित विभाग आणखी किती दिवस दुर्लक्ष करणार? मोठा अपघात होऊन जीवितहानी झाल्यानंतरच प्रशासनाला जाग येणार का, हा संतप्त सवाल उपस्थित होत आहे.

.....

रामोड

ठिकाणी अवैध व्यवसाय फोफावत आहेत. पोलीस प्रशासनाने अशा अवैध धंद्यांकडे गांभीर्याने लक्ष देऊन संबंधितांवर कठोर कारवाई करणे गरजेचे आहे. मात्र, काही ठिकाणी कारवाई होत नसल्याने नागरिकांमधून नाराजी व्यक्त केली जात आहे. कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी लक्ष घालून संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

मंगरूळ नं. १ च्या सरपंचांचा मटका खेळतानाचा व्हिडिओ व्हायरल; पोलिसांची कारवाई मात्र गुलदस्त्यात!

माजलगाव तालुक्यातील मंगरूळ नं. १ येथील सरपंच मटका खेळताना तसेच संबंधित ठिकाणी खुलेआम मटका घेतला जात असल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. गावाच्या विकासाची आणि गावातील कायदा-सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी असलेल्या सरपंचांचाच मटका खेळतानाचा व्हिडिओ समोर आल्याने नागरिकांमधून आश्चर्य व्यक्त केले जात आहे. विशेष म्हणजे, व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतरही माजलगाव पोलिसांकडून कोणतीही ठोस कारवाई करण्यात आली नसल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. खुलेआम मटका सुरू असल्याचे चित्र समोर येत असताना पोलीस प्रशासन नेमकी कोणती भूमिका घेत आहे, असा सवाल उपस्थित होत आहे. मटका हा बेकायदेशीर जुगाराचा प्रकार असताना त्याकडे दुर्लक्ष का केले जात आहे? व्हायरल व्हिडिओची सत्यता तपासून संबंधितांची चौकशी करावी आणि दोषी आढळल्यास कायद्यानुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे. आता मंगरूळ नं. १ मधील या प्रकरणात माजलगाव पोलिसांकडून कारवाई होणार की प्रकरणाकडे कानाडोळा केला जाणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

शेवटच्या पानावरून...

डॉ.रवींद्र जगतकर

रुग्णांना मंजूर पॅकेजनुसार कॅशलेस उपचारांची सुविधा उपलब्ध करून दिली जाते. प्रत्येक पात्र रुग्णाला वेळेत आणि रोखरहित उपचार मिळावेत, यासाठी रुग्णालये, आरोग्यमित्र आणि संबंधित प्रशासकीय यंत्रणांशी समन्वय साधणे महत्त्वाचे असते. ही जबाबदारी पार पाडताना रुग्णसेवेला प्राधान्य देऊन प्रक्रियात्मक अडचणी सोडविण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला जात असल्याचे डॉ. जगतकर यांनी नमूद केले. परळी वैजनाथसारख्या शहरातून पुढे जात ठाणे जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणेत महत्त्वाची जबाबदारी सांभाळणारे डॉ. रवींद्र जगतकर यांचे कार्य परळीकरांसाठी अभिमानास्पद मानले जात आहे. त्यांच्या माध्यमातून गरजू रुग्णांना शासकीय आरोग्य योजनांची माहिती आणि उपचारांचा लाभ मिळत असल्याने त्यांच्या कार्याचे कौतुक होत आहे.

.....

आ.विजयसिंह पंडित

मर्यादित नसून संपूर्ण महाराष्ट्रातील दिव्यांग बांधवांच्या जगण्याशी आणि स्वाभिमानाशी संबंधित आहे. आता मंत्री अतुल सावे आणि राज्य सरकार या मागणीची कितपत दखल घेणार, दिव्यांगांच्या मानधनात वाढ करण्यासाठी कोणता निर्णय घेणार, याकडे राज्यातील दिव्यांग बांधवांचे लक्ष लागले आहे. दिव्यांगांना केवळ सहानुभूती नको, तर सन्मानाने जगण्यासाठी आर्थिक आधार हवा आहे. त्यामुळे आता आश्वासनांपेक्षा प्रत्यक्ष निर्णयाची अपेक्षा व्यक्त होत आहे.

.....

कंपनीला नोटीस!

सोयाबीन पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. त्यावेळी कृषी विभाग आणि विमा कंपनीने संयुक्तपणे पीक सर्वेक्षण केले होते. या सर्वेक्षण अहवालांमध्ये सर्वेक्षणाच्या वेळी सोयाबीनचे पीक शेतात उभे असल्याचे स्पष्ट झाले होते. जवळपास ८० ते ८५ % नुकसान झाल्याचा अहवाल सदर करण्यात आलेला होता. असे असतानाही विमा कंपनीने संपूर्ण नुकसानभरपाई दिली नाही. पीक कापणी प्रयोगाचा आधार घेत केवळ ५० टक्के भरपाई वितरित केली. त्यामुळे उर्वरित भरपाई मिळावी, अशी मागणी शेतकरी बांधवांनी केली होती. शेतकरी बांधवांची बाजू विचारात घेऊन जिल्हाधिकाऱ्यांनी ३१ मे २०२२ रोजी, तर विभागीय समितीने २२ ऑगस्ट २०२२ रोजी पात्र शेतकऱ्यांना उर्वरित ५० टक्के नुकसान भरपाई देण्याचे निर्देश दिले होते. विमा कंपनीने या आदेशांची अंमलबजावणी न केल्याने १८ नोव्हेंबर २०२२ रोजी जिल्हाधिकाऱ्यांनी महसुली वसुली प्रमाणपत्राची कार्यवाहीही सुरू केली. मात्र, विमा कंपनीने उच्च न्यायालयात धाव घेतल्याने उच्च न्यायालयाने या कार्यवाहीला स्थगिती दिली. परिणामी शेतकऱ्यांची भरपाई पुन्हा रखडली. या प्रकरणातील आकडेवारीनुसार, जिल्ह्यात एकूण २ लाख २७ हजार शेतकरी भरपाईसाठी पात्र ठरले होते. २ लाख ६४ हजार ८१७ पूर्व सुचनांपैकी क्रॉप कॅलेंडर नुसार पीक काढणीच्या कालावधी नुसार १५ दिवसपूर्वी आलेल्या पूर्व सूचना ह्या स्थानिक नैसर्गिक आपत्ति या तरतुदी अंतर्गत ३० सप्टेंबर पर्यन्त पात्र असणाऱ्या २ लाख २७ हजार शेतकऱ्यांना ६५४ कोटी इतकी रक्कम मिळणे अपेक्षित होते. परंतु विमा कंपनीने पीक कापणी प्रयोगाचे भारांकण लाऊन केवळ ३२७ कोटी इतकीच रक्कम शेतकऱ्यांना दिली होती. या पूर्वीही माननीय उच्च न्यायालयामध्ये १००% रकमेसाठी मागणी करण्यात आलेली होती. परंतु न्यायालयाने पीक कापणी प्रयोगात उत्पन्न जास्त आल्याने शेतकऱ्यांची याचिका रद्द केली होती. त्यामुळे माननीय सर्वोच्च न्यायालयात शेतकऱ्यांसह धाव घेतली होती. हा प्रश्न केवळ काही शेतकऱ्यांच्या भरपाईपुरता मर्यादित नसून जिल्ह्यातील लाखो शेतकरी कुटुंबांच्या आर्थिक हक्काशी संबंधित आहे. उच्च न्यायालयाने १२ सप्टेंबर २०२५ रोजी दिलेल्या निर्णयानंतर या प्रकरणाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले. आज सर्वोच्च न्यायालयात शेतकऱ्यांची बाजू मांडली. शेतकऱ्यांच्या नुकसानीचे पुरावे, संयुक्त सर्वेक्षणाचे अहवाल आणि प्रशासकीय समित्यांचे आदेश विचारात घेऊन त्यांना उर्वरित भरपाई मिळावी, यासाठी आपण सातत्याने पाठपुरावा करीत आहेत. आता सर्वोच्च न्यायालयाने विमा कंपनीला नोटीस बजावल्याने या प्रकरणातील पुढील न्यायालयीन प्रक्रियेकडे आपले बारकाईने लक्ष राहणार आहे. या नोटिशीमुळे शेतकरी बांधवांची बाजू न्यायालयासमोर मांडण्याची पुढील प्रक्रिया सुरू झाली असून, अंतिम निर्णयानंतर भरपाईचा मार्ग मोकळा होण्याची अपेक्षाही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केली आहे. शेतकरी बांधवांच्या पिकांच्या नुकसानीचे ठोस पुरावे उपलब्ध आहेत. कृषी विभाग आणि विमा कंपनीच्या संयुक्त सर्वेक्षणातही पिके शेतात उभी असल्याचे स्पष्ट झाले होते. असे असतानाही शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काची संपूर्ण भरपाई मिळाली नाही, ही दुर्दैवी बाब आहे. उच्च न्यायालयातील निकालानंतरही आपण हा विषय सोडला नाही. शेतकरी बांधवांना न्याय मिळावा यासाठी सर्वोच्च न्यायालयात लढा सुरू ठेवला. आज न्यायालयाने विमा कंपनीला नोटीस बजावली, ही पुढील न्यायालयीन प्रक्रियेतील महत्त्वाची घडामोड आहे. राज्य आणि केंद्र सरकारच्या माध्यमातूनही शेतकऱ्यांची बाजू प्रभावीपणे मांडली जात आहे. विमा कंपनीच्या वकिलांकडून केस निकाली काढावी अशी विनंती करण्यात आली होती. मात्र न्यायालयाने आपले म्हणणे ऐकून घेत विमा कंपनीला नोटिस बजावली आहे. कंपनीला त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी चार आठवड्याची वेळ देण्यात आली आहे. राजकुमार पाटील,प्रशांत लोमटे यांच्यासह शेतकरी बांधवांच्या वतीने ॲड. सुधांशु चौधरी तर सिनियर काउन्सिल ॲड. बलबिर सिंग यांनी राज्य शासनाच्या वतीने न्यायालयात बाजू मांडली. जिल्ह्यातील शेतकरी बांधवांना त्यांच्या हक्काची भरपाई मिळेपर्यंत आपला पाठपुरावा आणि न्यायालयीन लढा सुरूच राहील तसेच खरीप २०२० चे प्रकरणही अंतिम टप्प्यात असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगीतले आहे.

.....

कर्करोगग्रस्त

खर्च करण्याची वेळ ग्रामीण रुग्णांवर येते. मात्र, माजलगावमध्येच दर्जेदार उपचार उपलब्ध झाल्यास रुग्णांचा प्रवास, निवास आणि उपचारांवरील मोठा आर्थिक भार कमी होऊ शकतो. नेपाळमधील रुग्णावरील यशस्वी शस्त्रक्रिया ही केवळ एका रुग्णाच्या उपचाराची घटना नसून, बीड जिल्ह्यातील ग्रामीण आरोग्यसेवेला जागतिक स्तरावर ओळख मिळवून देणारी महत्त्वपूर्ण सुरुवात ठरली आहे.

पुढील उपचारासाठीही इथेच येणार

कर्करोगाची शस्त्रक्रिया झाल्यानंतर रुग्णाला किमो आणि रेडीयशनचे पुढील उपचार करावे लागतात. या उपचारासह आयुर्वेदातील पंचकर्म उपचार घेण्यासाठी गुरुकृपा आरोग्यधाममध्येच येणार असल्याचे रुग्णाने व त्यांची मुलगी निकिता जैन यांनी सांगितले. रुग्ण कोणत्या देशाचा, जातीचा, धर्माचा आहे किंवा त्याची परस्थितीत काय आहे यापेक्षा त्याच्या वेदना आणि त्याला आवश्यक असलेली आरोग्यसेवा आमच्यासाठी अधिक महत्वाची आहे. सर्वसामान्य रुग्णाची मोठ्या शहरातील धावपळ, आर्थिक ओढाताण कमी होऊन दर्जेदार आरोग्यसेवा देणे हाच गुरुकृपा आरोग्यधामचा उद्देश आहे. रुग्णाला सन्मान, संवेदनशीलता आणि योग्य वैद्यकीय उपचार मिळावेत यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. **डॉ. यशवंत राजेभोसले, संस्थापक, गुरुकृपा होलिस्टिक कॅन्सर वेलनेस आरोग्यधाम, माजलगाव.**

महाराष्ट्रातील निर्भिड साप्ताहिक रविवार

जगमित्र

विष्णू निवृत्ती कदम
(संपादक जालना, आवृत्ती), ९४२२९९१०३२, ७३८५८९०४४४

PRGI.No.- MHMAR/25/A2848

जालना — बुधवार दि.१८ नोव्हेंबर २०२६ — पाने ४ — पान नं.३

ताडहादगाव येथे दहा वर्षानंतर जमला वर्गमित्रांचा मेळा

अंबड । ज्ञानेश्वर साळुंके

अंबड तालुक्यातील ताडहादगाव तब्बल १० वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीनंतर शाळेतील मित्र-मैत्रिणींची झालेली भेट, जुन्या आठवणींना मिळालेला उजाळा आणि शिक्षकांप्रती व्यक्त झालेली कृतज्ञता, अशा आनंददायी वातावरणात ताडहादगाव येथील मत्स्योदरी विद्यालयात माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा रविवारी पार पडला. शालेय जीवन संपल्यानंतर वेगवेगळ्या वाटांनी गेलेले मित्र-मैत्रिणी या निमित्ताने पुन्हा एकदा शाळेच्या प्रांगणात एकत्र आले.



तब्बल १० वर्षांनंतर झालेल्या या भेटीमुळे प्रत्येकाच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. शाळेतील गंमतीजमती, वर्गातील किस्से, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि जुन्या आठवणींना उजाळा देत स्नेहसंवाद रंगला. शिक्षकांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांना जीवनात यशस्वी होण्यासाठी मोलाचे मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनीही आपल्या शिक्षकांप्रती आदर आणि कृतज्ञतेची भावना व्यक्त केली. त्यानंतर शिक्षक आणि माजी विद्यार्थ्यांनी एकत्रित स्नेहभोजनाचा आस्वाद घेतला.

दर सहा महिन्यांनी आरोग्य तपासणी; कंत्राटी वेतनाची पडताळणी महिनाभरात पूर्ण करा : रवी रामू कलोसे

सफाई कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांवर राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाचे मनपा प्रशासनाला निर्देश

जालना । प्रतिनिधी

सफाई कर्मचाऱ्यांच्या आरोग्यापासून ते त्यांच्या वेतन, पदोन्नती आणि निवासाच्या प्रश्नांपर्यंत सर्वच बाबींमध्ये प्रशासनाने संवेदनशीलतेने आणि कालमर्यादित कार्यवाही करावी, असे निर्देश राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाचे सदस्य रवी रामू कलोसे यांनी जालना महानगरपालिका प्रशासनाला दिले. राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोग, नवी दिल्लीच्या वतीने महाराष्ट्र दौऱ्यांतर्गत श्री. कलोसे यांनी जालना महानगरपालिकेला आज रोजी भेट देत जालना महानगरपालिकेतील भारतरत्न श्री. अटल बिहारी वाजपेयी सभागृहात आढावा बैठकीत स्थायी व अस्थायी सफाई कर्मचाऱ्यांची संख्या, सेवाविषयक स्थिती, आरोग्य सुविधा, वेतन, सुरक्षा व्यवस्था आणि विविध कल्याणकारी योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेतला त्यावेळी ते बोलत होते. यावेळी जालना शहर महानगरपालिका आयुक्त अंजली शर्मा, मनपा उपायुक्त नंदा गायकवाड, नगरसचिव केशव कानपुडे, नगरपरिषद अधिकारी व कर्मचारी संघटनेचे पदाधिकारी धर्मा खिल्लारे, सिटू संघटनेचे पदाधिकारी मधुकर मोकळे, हरिश्चंद्र लोखंडे, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. पाटोदेकर, निवासी पोलीस उपअधीक्षक श्री. इंगोले, जालना शहर महानगरपालिकेचे कार्यालय अधिक्षक गणेश बत्तीन, स्वच्छता विभागाचे सुधीर डहाळे, कर विभागाचे प्रमुख राहुल देशमुख, नगर अभियंता सय्यद सउद, पाणीपुरवठा अभियंता तायडे, मालमत्ता विभागाचे राजेश चंदनशिवे संगणक विभागाचे आनंद मोहिदे यांची प्रमुख



उपस्थिती होती.

यावेळी श्री. कलोसे म्हणाले की, सफाई कर्मचाऱ्यांच्या आरोग्याचा प्रश्न महत्त्वाचा असून, सर्व कर्मचाऱ्यांची दर सहा महिन्यांनी नियमित आरोग्य तपासणी करण्यात यावी. महिला सफाई कर्मचाऱ्यांच्या तपासणीमध्ये स्तनाच्या कर्करोगाच्या तपासणीवर विशेष भर द्यावा, असे निर्देश कलोसे यांनी दिले. तसेच सेप्टिक टँक स्वच्छतेसाठी आवश्यक यंत्रसामग्री आणि कर्मचाऱ्यांना वैयक्तिक सुरक्षा साहित्य उपलब्ध करून देण्यास सांगितले. तसेच कंत्राटी सफाई कर्मचाऱ्यांना लागू किमान वेतनाच्या तरतुदींनुसार वेतन मिळणे आवश्यक आहे. हे वेतन थेट संबंधित कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यात जमा करावे. वेतन वितरणात कोणतीही अनियमितता होत नाही ना, याची खातरजमा करण्यासाठी चौकशी समिती नियुक्त करावी आणि समितीचा अहवाल एका महिन्यात सादर करावा, असे निर्देश श्री. कलोसे यांनी यावेळी दिले.

'नमस्ते' योजनेची माहिती पात्र सफाई कर्मचाऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी येत्या सात दिवसांत व्यापक प्रचार व जनजागृती करावी. कर्मचाऱ्यांची ओळखपत्रे आणि आरोग्यपत्रिका तयार करून जास्तीत जास्त पात्र कर्मचाऱ्यांना योजनेचा लाभ मिळवून द्यावा. सफाई कर्मचाऱ्यांच्या निवासाचा प्रश्न सोडविण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजनेअंतर्गत निवासस्थाने उपलब्ध करून देण्याबाबत महानगरपालिकेच्या महासभेचा ठराव घ्यावा आणि त्यानंतर आवश्यक प्रस्ताव शासनाकडे सादर करावा. लाड व पागे समितीच्या शिफारशींनुसार प्राप्त झालेली प्रलंबित प्रकरणे आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करून नियमानुसार तातडीने निकाली काढावीत. कर्मचाऱ्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार लागू सेवा नियमांच्या अधीन राहून पदोन्नतीची कार्यवाही करावी. सर्व सफाई कर्मचाऱ्यांची सेवापुस्तके अद्ययावत करावीत. पात्र कर्मचाऱ्यांना कालबद्ध पदोन्नती तसेच १०, २० आणि ३० वर्षांच्या सेवेनंतरचे अनुज्ञेय लाभ तातडीने देण्याची कार्यवाही करावी. शासकीय सुट्ट्यांचा लाभ द्यावा किंवा सुट्टीच्या दिवशी काम केल्यास नियमानुसार मोबदला द्यावा असेही श्री. कलोसे म्हणाले.

शहरातील सामुदायिक शौचालयांच्या स्थितीचाही आढावा घेत, सफाई कर्मचाऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी महानगरपालिका स्तरावर समिती स्थापन करून त्यामध्ये कर्मचारी संघटनांच्या प्रतिनिधींना स्थान द्यावे. मंगल कार्यालये आणि हॉटेलमध्ये स्वच्छतेची कामे करणाऱ्या व्यक्तींच्या अनुषंगाने Manual Scavengers Act नुसार आवश्यक सर्वेक्षण करून घोषणापत्रे घ्यावीत. प्राप्त अर्ज व घोषणापत्रांची आयुक्तांनी पडताळणी करून संबंधित प्रकरणांचे प्रस्ताव जिल्हास्तरीय समितीमार्फत शासनाकडे पाठवावेत. मागील १० ते १५ वर्षांपासून सातत्याने महानगरपालिकेत कार्यरत असलेल्या कंत्राटी सफाई कर्मचाऱ्यांची शैक्षणिक पात्रता आणि सेवेसंबंधी कागदपत्रे तपासून त्यांच्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे सादर करावेत. सफाई कर्मचाऱ्यांचे आरोग्य, सुरक्षितता, आर्थिक हित आणि सेवाविषयक हक्क यांची प्रभावी अंमलबजावणी करण्याची जबाबदारी महानगरपालिका प्रशासनाने पार पाडावी, असे निर्देश यावेळी श्री. कलोसे यांनी दिले.

बैठकीच्या प्रारंभी महानगरपालिका आयुक्त, जिल्हा शल्यचिकित्सक, पोलीस अधीक्षक यांचे प्रतिनिधी आणि सफाई कर्मचारी संघटनांच्या प्रतिनिधींचा परिचय करून सादरीकरणाद्वारे माहिती सादर केली. यावेळी मनपातील अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

राहुल गांधींनी अराजकतेऐवजी दुष्काळी भागातील शेतकऱ्यांसाठी काम करावे : खा.डॉ. अजित गोपछडे

काँग्रेसने संविधानाचा राजकीय स्वार्थासाठी वापर करू नये : जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे

जालना । प्रतिनिधी

लोकशाही वाचवा - अराजकता हटवा अभियानांतर्गत भारतीय जनता पार्टी जालना महानगर च्या वतीने राष्ट्र चिंतन संवाद बैठक आज दि.१६ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ११.०० वा भाजपा जालना महानगर प्रभारी खा.डॉ. अजित गोपछडे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाली. यावेळी भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, रामेश्वर पाटील भांदरगे, बद्रीनाथ पठाडे, सभापती अशोक पांगारकर, जिल्हा सरचिटणीस अमोल कारंजेकर, शिवप्रकाश चितळकर, वसंत शिंदे, सुनील पवार, अरुणाताई जाधव, डॉ. मिसाळ, अर्जुन गेही, महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष शुभांगीताई देशपांडे, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष गोविंद भताने, किसान मोर्चा जिल्हाध्यक्ष सतीश केरकळ, मंडळ अध्यक्ष सुनील खरे, संजय डोंगरे, अमोल धानुरे आदींची प्रमुख उपस्थिती होती.



खा.डॉ. गोपछडे म्हणाले की, देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकार देशाच्या सर्वांगीण विकासासाठी भक्कमपणे कार्यरत आहे. देशाची अर्थव्यवस्था मजबूत करण्यासोबतच विकासाच्या विविध योजना सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचविण्याचे काम केंद्र सरकार करीत आहे. मात्र, विरोधकांकडून विविध मुद्द्यांवर जनतेमध्ये संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. राहुल गांधी यांनी जंतरमंतर मैदानावर आंदोलन करून देशात अराजकता निर्माण करण्यापेक्षा महाराष्ट्रातील दुष्काळी भागातील शेतकऱ्यांसाठी काम करावे आणि शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या जाणून घ्याव्यात असे त्यांनी सांगितले.

जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे म्हणाले की, संविधान हे देशाच्या एकतेचे, अखंडतेचे आणि लोकशाही मूल्यांचे प्रतीक आहे. भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला समान अधिकार, न्याय आणि स्वातंत्र्य दिले आहे. मात्र काँग्रेसकडून याच संविधानाचा राजकीय स्वार्थासाठी वापर केला जात असून, जनतेमध्ये गैरसमज निर्माण करण्याचे काम केले जात आहे. संविधानाच्या नावाखाली वारंवार खोटे कथानक मांडून केंद्र सरकारविरोधात वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. संविधान हे संपूर्ण देशाचा अभिमान आहे. त्यामुळे संविधानाच्या नावाखाली जनतेची दिशाभूल करण्याचे आणि देशात संभ्रमाचे वातावरण निर्माण करण्याचे राजकारण काँग्रेसने थांबवावे. देशाच्या एकतेशी आणि संवैधानिक संस्थांशी संबंधित विषयांवर राजकीय स्वार्थ बाजूला ठेवून जबाबदारीने भूमिका मांडली पाहिजे, असेही भास्कर आबा दानवे यांनी सांगितले.

यावेळी नगरसेवक महावीर ढक्का, महेश निकम, रमेश गौरक्षक, कल्याण भदनेकर, शशिकांत घुगे, भगवान चांदोडे, शिवराज नारीयलवाले, संजय पाखरे, सिद्धिविनायक मुळे, सुशीलाताई दानवे, अड रिमा खरात, पूनम स्वामी, सखुबाई पणबिसरे, वर्षा राऊत, सुलोचना गोर्डे, रूपा कुरील, स्नेहलता कामड, पद्मा मानधनी, वैशाली बनसोडे, विष्णू डोंगरे, जिवन सले, प्रियंका भूरेवाल, विजय कामड, सोमेश काबलिये, परसराम तळेकर, काकासाहेब घुले, गजानन खरात, सुधाकर खरात, राजाराम जाधव, सिद्धेश्वर हाजबे, प्रा.राजेंद्र भोसले, सुहास मुंडे, विजय पवार, विकास कदम, मनोजकुमार जोशी, संजय भगत, मनोज इंगळे, रवि कायंदे, बद्रीनाथ वाघ, सुमित सुरडकर, करण निकाळजे, निलेश गवळी, कैलास सोळुंके, अजित मानधनी, विठ्ठल इंदलकर, राजेश स्वामी, रोहित भूरेवाल, दत्ता जाधव, सुखदेव महाराज गोरे, हरिभाऊ गोरे, गुलाब पणबिसरे, सुधाकर शिंदे, शाम उगले, महादेव कावळे, संदीप नाईकवाडे, अमोल भवर, विष्णू राठोड, पंकज किल्लेदार, यश खरात, अकबर परसुवाले या बैठकीस भाजपाचे पदाधिकारी, विविध आघाडयांचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी तसेच भाजपा कार्यकर्ते उपस्थित होते.

बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिदिनानिमित्त शिवसेना मंठा शाखेच्या वतीने ग्रामीण रुग्णालयात फळवाटप

मंठा । प्रतिनिधी

हिंदुहृदयसम्राट, शिवसेनाप्रमुख वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिदिनानिमित्त शिवसेना मंठा शाखेच्या वतीने ग्रामीण रुग्णालय, मंठा येथे रुग्णांना फळवाटप करून सामाजिक बांधिलकी जपण्यात आली. या उपक्रमाच्या माध्यमातून बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यात आले. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी आयुष्यभर सर्वसामान्य माणसाच्या हक्कांसाठी आणि समाजहितासाठी कार्य केले. त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेत सामाजिक उपक्रम राबविण्याच्या उद्देशाने शिवसेना मंठा शाखेच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



यावेळी ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल असलेल्या रुग्णांची आस्थेने विचारपूस करण्यात आली. तसेच त्यांच्या प्रकृतीची माहिती घेऊन रुग्णांना फळांचे वाटप करण्यात आले. सामाजिक सेवेतून शिवसेनाप्रमुखांच्या स्मृतींना अभिवादन करण्याचा हा उपक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन शिवसेना मंठा तालुकाप्रमुख दिगंबर बोराडे व देविदास खरात (शिवसेना उपतालुकाप्रमुख, मंठा) यांच्या संयुक्त पुढाकारातून करण्यात आले.

यावेळी दिगंबर बोराडे (शिवसेना तालुकाप्रमुख, मंठा), अनंता वैद्य (जिल्हा समन्वयक, जालना), देविदास खरात (शिवसेना उपतालुकाप्रमुख, मंठा), प्रल्हाद सिरसाठ (शिवसैनिक), रझाद भाई केधळीकर, प्रल्हादराव कदम, संभाजी घारे, नवनाथ ढेगळे (युवासेना उपतालुकाप्रमुख, मंठा), गोपी गायकवाड (युवासेना शहरप्रमुख, मंठा), दत्ता काळे (युवासेना तालुका सचिव, मंठा), सिद्धेश्वर खंदारे (युवासेना उपतालुकाप्रमुख), मनु गिरी (युवासेना उपतालुकाप्रमुख), संतोष शेंडगे (युवासेना उपतालुकाप्रमुख), आवेश पठाण (युवासेना उपतालुकाप्रमुख), माऊली खरात (युवासेना उपतालुकाप्रमुख) व ज्ञानेश्वर खंदारे यांच्यासह शिवसेना व युवासेनेचे पदाधिकारी आणि शिवसैनिक उपस्थित होते. बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित या फळवाटप उपक्रमातून रुग्णसेवेचा, सामाजिक बांधिलकीचा आणि सेवाभावाचा संदेश देण्यात आला.

अंबड तालुक्यात पाचवी नवोदय क्लासेसच्या नावाखाली शिक्षणाचा बाजार; शासकीय शिक्षकांकडूनच पालकांची लूट?

जिल्हा परिषद शिक्षकांचे अवैध खासगी क्लासेस जोमात; शिक्षण विभाग कारवाई करणार की पाठीशी घालणार? बळीराजाचा संतप्त सवाल

अंबड । प्रतिनिधी

जालना जिल्हासह अंबड तालुक्यातील एकीकडे दुष्काळ आणि आसमानी संकटामुळे बळीराजा आर्थिक संकटात सापडला असतानाच, दुसरीकडे अंबड तालुक्यात शिक्षणाच्या बाजारीकरणाचा नवीन फंडा सुरू झाला आहे. इयत्ता पाचवीच्या 'नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेच्या' नावाखाली काही जिल्हा परिषद (शासकीय) शिक्षकच स्वतःचे अवैध खासगी क्लासेस चालवून पालकांची आर्थिक लूट करत असल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. शासनाचा भरघोस पगार घेऊनही खासगी शिकवण्यांचा धंदा मांडणाऱ्या या शिक्षकांवर गटशिक्षणाधिकारी आणि वरिष्ठ अधिकारी कारवाई करणार की त्यांना पाठीशी घालणार, असा संतप्त सवाल आता पालक आणि शेतकरी वर्गातून उपस्थित केला जात आहे.



काय आहे नेमका प्रकार?

जिल्हा परिषद शाळांमध्ये विद्यार्थ्यांना दर्जेदार आणि मोफत शिक्षण देण्याची जबाबदारी या शिक्षकांवर आहे. मात्र, अनेक शिक्षक शाळेतील कामकाजाकडे दुर्लक्ष करून नवोदय परीक्षेच्या तयारीच्या नावाखाली खासगी बॅचेस चालवत आहेत. या क्लासेससाठी पालकांकडून अव्वाच्या सव्वा फी आकारली जात आहे. आपल्या मुलाचे भविष्य घडावे, या आशेने आधीच आर्थिक विवंचनेत असलेला शेतकरी आणि सर्वसामान्य पालक कर्ज काढून किंवा पोटाला चिमटा घेऊन या शिक्षकांच्या क्लासेसची फी भरत आहे.

शासकीय नियमांना हरताळ

शासकीय सेवेत असताना कोणत्याही शिक्षकाला खासगी शिकवणी घेण्यास कायद्याने सक्त मनाई आहे. असे असतानाही अंबड शहर आणि ग्रामीण भागात काही शिक्षकांनी उघडपणे खासगी क्लासेसचा धुमाकूळ घातला आहे. विशेष म्हणजे, या प्रकाराची माहिती शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांना असूनही अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. त्यामुळे शिक्षण विभागाचे या 'शिक्षण सम्राटांशी' काही साटेलोटे आहे का, अशी शंकाही नागरिक व्यक्त करत आहेत. एकीकडे निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतीतून उत्पन्न निघत नाही, घर चालवणे कठीण झाले आहे. त्यातच सरकारी पगार घेणारे शिक्षकच नवोदयच्या नावाखाली खासगी क्लासेस घेऊन आमची लूट करत आहेत. शिक्षण विभागाने या अवैध क्लासेसवर तात्काळ बंदी घालून संबंधित शिक्षकांवर निलंबनाची कारवाई करावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल.

- संतप्त पालक व शेतकरी वर्ग,

प्रशासनाच्या भूमिकेकडे लक्ष

दुष्काळाच्या छायेत असलेल्या शेतकऱ्यांना शासन एकीकडे मदतीचे आश्वासन देत असताना, दुसरीकडे शासकीय यंत्रणेतीलच काही घटक पालकांची पिळवणूक करत आहेत. आता जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि शिक्षणाधिकारी या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन अवैध क्लासेस चालवणाऱ्या शिक्षकांवर कारवाईचा बडगा उगारणार का, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

दिवाळीच्या सुट्ट्या संपल्या, तरी सरकारी कार्यालयांत 'बुट्ट्या

अधिकारी-कर्मचाऱ्यांचा हॉलिडे मूड कायम; शासकीय कामांसाठी येणाऱ्या नागरिकांची मात्र ससेहोलपट!

मंठा । प्रतिनिधी

दिवाळीचा सण संपला, सुट्ट्याही संपल्या; मात्र काही शासकीय कार्यालयांमधील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा सुट्ट्यांचा मूड अद्याप संपलेला दिसत नाही. कार्यालये सुरू झाली असली तरी अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या अनुपस्थितीमुळे शासकीय कामकाजाचा मात्र बोजवारा उडत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे. दिवाळीच्या सुट्ट्यानंतर आपली महत्त्वाची शासकीय कामे मार्गी लागतील, या अपेक्षेने ग्रामीण भागातील नागरिक तहसील कार्यालय, पंचायत समिती, कृषी विभाग, भूमिअभिलेख तसेच अन्य शासकीय कार्यालयांमध्ये चकरा मारत आहेत. मात्र संबंधित अधिकारी किंवा कर्मचारी जागेवर उपलब्ध नसल्यास नागरिकांना रिकाम्या हाताने परतावे लागत आहे.

सामान्य नागरिकांना एखादा दाखला मिळविण्यासाठी, शासकीय योजनेचा लाभ घेण्यासाठी किंवा प्रलंबित कामाचा पाठपुरावा करण्यासाठी वारंवार कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागतात. शेतकरी, शेतमजूर आणि सर्वसामान्य नागरिक आपला रोजगार बुडवून कार्यालयात येतात. मात्र अधिकारी-कर्मचारीच उपस्थित नसतील तर नागरिकांनी न्याय मागायचा तरी कोणाकडे? दिवाळीच्या सुट्ट्या संपल्यानंतर कार्यालयीन वेळेत नियमित उपस्थित राहून प्रलंबित कामे मार्गी लावणे ही अधिकारी-कर्मचाऱ्यांची जबाबदारी आहे. वैयक्तिक रजा घेण्याचा अधिकार असला तरी कार्यालयीन कामकाजावर त्याचा परिणाम होणार नाही, याची दक्षता घेणेही तितकेच आवश्यक आहे. विशेष म्हणजे, नागरिकांनी वेळेत शासकीय कार्यालयात हजर राहावे, नियमांचे पालन करावे, अशी अपेक्षा प्रशासनाकडून केली जाते. मग अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीबाबतही प्रशासन तितकेच कठोर राहणार का? जिल्हा प्रशासनाने मंठा तालुक्यातील शासकीय कार्यालयांमधील अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीची अचानक तपासणी करावी. विनाकारण गैरहजर राहणाऱ्यांवर कारवाई करून नागरिकांची प्रलंबित कामे तातडीने मार्गी लावावीत, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे. दिवाळीचा आनंद साजरा झाला, आता तरी कार्यालयीन कामकाजाला शिस्त लागणार का? की नागरिकांना पुन्हा हेलपाटे मारण्याची वेळ येणार? हा खरा प्रश्न आहे!

उबाळे कुटुंबास शासन स्तरावर आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी सर्वतोपरी पाठपुरावा करणार : भाजपा जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे

भास्कर आबा दानवे यांच्याकडून उबाळे कुटुंबाला एक लाख रुपयांची आर्थिक मदत

जालना । प्रतिनिधी

जालना तालुक्यातील मौजे नंदापूर येथील किसन निळूबा उबाळे यांच्या घराला शॉर्टसर्किटमुळे लागलेल्या भीषण आगीत मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. या पार्श्वभूमीवर भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी उबाळे कुटुंबीयांची भेट घेऊन आगीमुळे झालेल्या नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी केली. दिनांक ०४ नोव्हेंबर २०२६ रोजी दुपारी ३ वाजेच्या सुमारास विजेच्या तारांमध्ये झालेल्या शॉर्टसर्किटमुळे उबाळे यांच्या घराला आग लागली होती. घराच्या पहिल्या मजल्यावर कापसाचा साठा होता. घराचे लाकडी माळवद व दुमजली बांधकाम असल्याने आगीने काही वेळातच रौद्ररूप धारण केले. या भीषण आगीत घरातील संसारोपयोगी साहित्य, मुलांचे शालेय पाठ्यपुस्तके, कापूस, धान्य तसेच इतर मौल्यवान वस्तू जळून खाक झाल्या. या दुर्घटनेत उबाळे कुटुंबाचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून, राहते घरही उद्ध्वस्त झाल्याने सध्या या कुटुंबाला दुसऱ्याच्या घरी आश्रय घ्यावा लागत आहे. यावेळी भास्कर आबा दानवे यांनी उबाळे कुटुंबीयांशी संवाद साधून दुर्घटनेची सविस्तर माहिती घेतली. अचानक ओढवलेल्या या संकटामुळे कुटुंबावर निर्माण झालेली परिस्थिती अत्यंत वेदनादायी आहे. अशा कठीण प्रसंगी केवळ सहानुभूती न दाखवता प्रत्यक्ष मदतीचा हात देणे ही सामाजिक बांधिलकी आहे, या भावनेतून भास्कर आबा दानवे यांनी उबाळे कुटुंबाला एक लाख रुपयांची रोख आर्थिक मदत दिली व त्यांच्या कुटुंबातील मुलाना शालेय साहित्य देऊन त्यांना धीर दिला.



तसेच, घटनास्थळाची पाहणी करताना जालना तहसीलदार तसेच महावितरणच्या कार्यकारी अभियंत्यांशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधून झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करण्याची आणि शासकीय आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याची विनंती केली. यासंदर्भात बोलताना भास्कर आबा दानवे म्हणाले की, उबाळे कुटुंबावर आलेले संकट अत्यंत दुर्दैवी असून, या कठीण प्रसंगी आम्ही त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत. त्यांना शासनाकडून योग्य ती आर्थिक मदत मिळावी यासाठी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेऊन शासन स्तरावर सर्वतोपरी पाठपुरावा करणार आहे असे आश्वासन दिले.

याप्रसंगी समवेत भाजपा जिल्हा सरचिटणीस वसंत शिंदे, सुनिल पवार, भाजपा किसान मोर्चा जिल्हाध्यक्ष सतीश केरकळ, भाजपा ग्रामिण तालुकाध्यक्ष संजय डोंगरे, विष्णु डोंगरे, गोवर्धन कोल्हे, कैलाश उबाळे, मुकेश चव्हाण, गजानन खरात, सरपंच दत्तू कुरधणे, काकासाहेब घुले, पांडुरंग क्षीरसागर, राजाराम राजे जाधव, रवि कायंदे, सतीश जारे, प्रल्हाद ढवळे, शिवाजी ढगे, शिवाजी गायकवाड, नागेश अंभोरे, प्रशांत उबाळे, नवनाथ म्हस्के, नितीन कायंदे, विनायक पवार, करण निकाळजे, विकास कदम, यश खरात, ज्ञानेश्वर उबाळे, लिंबाजी शिंदे, विलास टेकाळे, ऊत्तम खरात, सुदर्शन उबाळे, लक्ष्मण शेळके, रवींद्र खरात, सखाराम चव्हाण, गोवर्धन उबाळे, कैलाश सोळुंके, सुखदेव महाराज चांदगुडे, रामदास अण्णा खरात, ऋषि कुरधणे, प्रतिक उबाळे, दीपक उबाळे, रमेश चव्हाण, अशोक उबाळे, छत्रभूज उबाळे, काशीनाथ उबाळे, अशोक उबाळे, शिवाजी वानखेडे, महेश वाघ, अमोल उबाळे, रामेश्वर उबाळे, राजेंद्र चांदगुडे, बाबासाहेब चव्हाण, गणपत कुरधणे, रामु शिंदे तसेच गावकरी मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

संतोष सोनवणे (लातूर जिल्हा प्रतिनिधी)
मो.9673158719

PRGI.No.- MHMAR/26/A2511

लातूर जिल्हा आवृत्ती — बुधवार दि.१८ नोव्हेंबर २०२६ — पान नं.४



किसना डायमंड अँड गोल्ड ज्वेलरीचे लातूरमध्ये भव्य एक्सक्लुझिव्ह शोरूम सुरू!

संस्थापक घनश्यामभाई ढोलकिया यांच्या हस्ते उद्घाटन; महाराष्ट्रातील १४ वे शोरूम लातूरमध्ये दाखल, आमदार अमित देशमुख यांची उपस्थिती; सामाजिक बांधिलकी जपत विविध उपक्रमांचे आयोजन

लातूर । संतोष सोनवणे

देशातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या नैसर्गिक हिऱ्यांच्या दागिन्यांच्या क्षेत्रात देशभरात वेगाने विस्तार करणाऱ्या 'किसना डायमंड अँड गोल्ड ज्वेलरी' या नामांकित ब्रँडच्या भव्य एक्सक्लुझिव्ह शोरूमचे उद्घाटन लातूर शहरात उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. हरीकृष्णा ग्रुपचे संस्थापक तथा किसनाचे संस्थापक घनश्यामभाई ढोलकिया, आमदार अमित देशमुख, पंढरपूर देवस्थानाचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज, प्रीतम इटकर, आयुष इटकर यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी उपस्थित खासदार डॉ. शिवाजी काळगे, महापौर जयश्रीताई सोनकांबळे, आमदार संभाजी भैया पाटील निलंगेकर, माजी आमदार धीरज भैया विलासराव देशमुख, जेष्ठ विधीज्ञ ऍड.अण्णारावजी पाटील, शैलेश लाहोटी आदी विविध मान्यवर उपस्थितीत होते. महाराष्ट्रातील हे किसनाचे १४ वे एक्सक्लुझिव्ह शोरूम असून, लातूरच्या व्यापार आणि सराफा क्षेत्राच्या दृष्टीने ही महत्त्वपूर्ण भर मानली जात आहे.

या उद्घाटन सोहळ्यास आमदार अमित देशमुख यांची विशेष उपस्थिती होती. यावेळी त्यांनी नूतन शोरूमला भेट देऊन संचालकांचे अभिनंदन केले. लातूर शहर हे शिक्षण, व्यापार, उद्योग आणि सांस्कृतिक क्षेत्रात सातत्याने प्रगती करणारे शहर आहे. अशा नामांकित ब्रँडचे शोरूम लातूरमध्ये सुरू होणे ही शहराच्या वाढत्या बाजारपेठेची आणि ग्राहकांच्या बदलत्या आवडी-निवडीची पोचपावती आहे. आधुनिक काळात ग्राहकांना दर्जेदार उत्पादने, आकर्षक डिझाइन्स आणि विश्वासार्ह सेवा अपेक्षित असते. किसना ज्वेलरीच्या माध्यमातून लातूरकरांना हिऱ्यांच्या आणि सोन्याच्या दागिन्यांचे विविध पर्याय एकाच छताखाली उपलब्ध होणार आहेत. या नव्या व्यावसायिक उपक्रमाला शुभेच्छा देत लातूरच्या आर्थिक आणि व्यावसायिक विकासात अशा उद्योगांची भर पडणे निश्चितच स्वागतार्ह असल्याचे मत आमदार अमित देशमुख यांनी व्यक्त केले.



नूतन शोरूम दुकान क्रमांक २, एस स्क्वेअर, एचडीएफसी बँकेसमोर, औसा रोड, लातूर येथे सुरू करण्यात आले आहे. या शोरूममध्ये हिऱ्यांच्या आणि सोन्याच्या दागिन्यांचे आकर्षक, आधुनिक तसेच नवीनतम डिझाइन्सचे विस्तृत कलेक्शन ग्राहकांसाठी उपलब्ध करून देण्यात आले आहे. लातूर शहरासह परिसरातील ग्राहकांना उत्कृष्ट गुणवत्ता, पारदर्शक व्यवहार आणि खरेदीचा उत्तम अनुभव देण्याचा कंपनीचा प्रयत्न आहे.

प्रत्येक भारतीय घरापर्यंत दर्जेदार दागिने पोहोचविण्याचे ध्येय

उद्घाटनप्रसंगी बोलताना हरीकृष्णा ग्रुपचे संस्थापक व व्यवस्थापकीय संचालक घनश्यामभाई ढोलकिया म्हणाले की, देशातील प्रत्येक भारतीय कुटुंबापर्यंत सुंदर, दर्जेदार आणि आकर्षक हिऱ्यांचे व सोन्याचे दागिने पोहोचविणे हे 'किसना'चे प्रमुख ध्येय आहे. महाराष्ट्र ही आमच्यासाठी महत्त्वाची बाजारपेठ असून लातूरमधील नवीन शोरूमचे उद्घाटन हा विस्तार प्रवासातील आणखी एक महत्त्वाचा टप्पा आहे. केवळ रिटेल नेटवर्क वाढविणे हाच आमचा उद्देश नसून ग्राहकांसोबत विश्वासाचे आणि दीर्घकालीन नातेसंबंध निर्माण करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. लातूरकरांकडून आमच्या डिझाइन्स आणि सेवांना निश्चितच चांगला प्रतिसाद मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

महाराष्ट्रातील १४ वे शोरूम हा विस्तारातील महत्त्वाचा टप्पा

किसनाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पराग शाह म्हणाले की, किसना देशभरात आपले अस्तित्व सातत्याने मजबूत करत आहे. महाराष्ट्रातील १४ व्या एक्सक्लुझिव्ह शोरूमचे उद्घाटन हा आमच्या विस्तार प्रवासातील महत्त्वाचा टप्पा आहे. लातूरमधील ग्राहकांना आता एकाच छताखाली हिऱ्यांच्या आणि सोन्याच्या दागिन्यांचा आकर्षक संग्रह, उत्कृष्ट गुणवत्ता आणि उत्तम ग्राहकसेवेचा अनुभव मिळणार आहे. व्यावसायिक भागीदारांच्या सहकार्याने देशभरातील अधिकाधिक शहरांमध्ये किसनाचा विस्तार करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत, असे त्यांनी सांगितले.

लातूरकरांच्या विश्वासाला सर्वोच्च प्राधान्य

लातूरस्थित व्यावसायिक भागीदार प्रीतम इटकर आणि आयुष इटकर म्हणाले की, किसना या प्रतिष्ठित राष्ट्रीय ब्रँडसोबत लातूरमध्ये नवीन व्यावसायिक उपक्रम सुरू करणे हा आमच्यासाठी अभिमानाचा आणि आनंदाचा क्षण आहे. ग्राहकांना सर्वोत्तम डिझाइन्स, गुणवत्ता, पारदर्शक व्यवहार आणि समाधानकारक खरेदीचा अनुभव देण्याचा आमचा प्रयत्न राहील. या नवीन उपक्रमाला लातूरकरांचे प्रेम, सहकार्य आणि आशीर्वाद मिळतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

उद्घाटनासोबत सामाजिक बांधिलकीचेही दर्शन

किसना डायमंड अँड गोल्ड ज्वेलरीने शोरूमच्या उद्घाटन सोहळ्याला केवळ व्यावसायिक कार्यक्रमाचे स्वरूप न देता सामाजिक बांधिलकीची जोड दिली. यानिमित्त स्वच्छ भारत अभियान, वृक्षारोपण, रक्तदान शिबिरे आणि गरजू व्यक्तींना अन्नवाटप अशा विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांच्या माध्यमातून स्वच्छता, पर्यावरण संवर्धन, रक्तदानाचे महत्त्व आणि गरजूंची सेवा करण्याचा संदेश देण्यात आला. व्यावसायिक क्षेत्रात यश संपादन करताना समाजाप्रती असलेली जबाबदारीही प्रामाणिकपणे पार पाडली पाहिजे, हा संदेश या उपक्रमांतून देण्यात आला. किसना देशभरातील आपल्या शोरूमच्या माध्यमातून सामाजिक आणि सार्वजनिक कल्याणकारी उपक्रमांना प्रोत्साहन देत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

ग्राहकांसाठी आकर्षक उद्घाटन ऑफर्स

नवीन शोरूमच्या उद्घाटनानिमित्त ग्राहकांसाठी विशेष आणि आकर्षक ऑफर्स उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. हिऱ्यांच्या आणि सोन्याच्या दागिन्यांच्या विविध प्रकारांसह ग्राहकांना या ऑफर्सचा लाभ घेता येणार आहे. प्रत्येक सण, समारंभ, विवाह सोहळा आणि आयुष्यातील आनंदाचे क्षण अधिक अविस्मरणीय बनविण्यासाठी किसना आपल्या दर्जेदार दागिन्यांच्या माध्यमातून ग्राहकांच्या सेवेत दाखल झाले आहे. लातूरच्या औसा रोडवरील या नव्या शोरूममुळे शहराच्या व्यावसायिक वैभवात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला असून, दागिन्यांच्या खरेदीसाठी लातूरकरांना आता आंतरराष्ट्रीय दर्जाच्या ब्रँडचा अनुभव आपल्या शहरातच घेता येणार आहे.

गरसूळ येथे गरजू महिलांना 'आनंदाचा शिधा' वाटप

एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकीचा उपक्रम; शिवसेना तालुकाप्रमुख कोंडीराम काळे यांनी केला उपक्रम यशस्वी

रेणापूर । प्रतिनिधी

समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि गरजू घटकांना सणासुदीच्या काळात दिलासा मिळावा, या सामाजिक भावनेतून गरसूळ येथे अत्यंत गरीब व गरजू महिलांना शिवसेनेचे नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून 'आनंदाचा शिधा' वाटप करण्यात आला.



या उपक्रमामुळे गरजू महिलांच्या चेहऱ्यावर समाधान आणि आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले. समाजातील वंचित व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या मदतीसाठी अशा प्रकारचे उपक्रम राबविणे ही काळाची गरज असून, सामाजिक संवेदनशीलतेचा संदेश देण्यात आला.

जपण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरला. यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख कोंडीराम काळे उपस्थित होते. तसेच गावातील नागरिक सुरेश चव्हाण यांच्यासह इतर नागरिक व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. गरजू महिलांपर्यंत मदतीचा हात पोहोचविण्याच्या या उपक्रमातून सामाजिक संवेदनशीलतेचा संदेश देण्यात आला.

औसा न्यायालयीन कर्मचारी संपावर

१७ नोव्हेंबरपासून राज्यभरातील न्यायालयीन कर्मचारी बेमुदत संपावर; सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याची प्रमुख मागणी

औसा । बी.डी. उबाळे

'समान काम, समान वेतन' या न्याय्य मागणीसाठी लातूर जिल्ह्यातील न्यायालयीन कर्मचारी संघटनेच्या वतीने औसा न्यायालयाच्या समोर मंगळवार दि १७ नोव्हेंबर २०२६ पासून बेमुदत संप पुकारला आहे. या बेमुदत संपात सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याच्या मागणीसाठी शासनाने न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागणीची तातडीने दखल घेऊन न्याय द्यावा, अशी जोरदार मागणी कर्मचाऱ्यांकडून करण्यात येत आहे.



न्यायव्यवस्थेचा महत्त्वाचा घटक असलेल्या न्यायालयीन कर्मचाऱ्यांनाच आपल्या न्याय्य हक्कांसाठी संघर्ष करावा लागत असल्याची खंत कर्मचाऱ्यांनी व्यक्त केली आहे. एकाच स्वरूपाचे काम करणाऱ्या कर्मचारी यांना समान वेतन मिळणे हा त्यांचा न्याय्य अधिकार असून, या मागणीकडे शासनाने दुर्लक्ष करू नये, अशी भूमिका कर्मचाऱ्यांनी मांडली आहे.

मा. मुंबई उच्च न्यायालयाने दि.३१ जानेवारी २०२५ रोजी सुधारित वेतनश्रेणीसंदर्भातील प्रस्ताव शासनाकडे पाठविला आहे. मात्र, अद्याप या प्रस्तावाला मंजुरी मिळालेली नसल्याने कर्मचाऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. उच्च न्यायालयाकडून शासनाकडे पाठविण्यात आलेला हा प्रस्ताव तातडीने मंजूर करून न्यायालयीन कर्मचाऱ्यांना सुधारित वेतनश्रेणी लागू करावी, अशी मागणी करण्यात येत आहे. यावेळी लातूर जिल्हा न्यायालयीन कर्मचारी संघटनेचे सचिव गणेश नागुरे, अधिक्षक एस एस टप्पू, सहायक अधीक्षक आर.आर. काळे, ए.बी. बिराजदार, सचिव संघटक एम.एम.शेख आदि कर्मचारी संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते. 'समान काम, समान वेतन मिळालेच पाहिजे!', 'न्याय देणाऱ्या न्यायव्यवस्थेतील कर्मचाऱ्यांनाच न्याय कधी मिळणार?' असे सवाल उपस्थित करत कर्मचाऱ्यांनी शासनाचे लक्ष वेधले आहे.

लातूर आरटीओ कार्यालयाकडून परिवहनोत्तर संवर्गातील वाहनांसाठी "MH24-CJ' नवीन मालिका सुरू

लातूर । प्रतिनिधी

परिवहनोत्तर संवर्गातील (Non-Transport 2W) वाहनांकरिता "MH24-CJ' ही नवीन मालिका सुरू करण्यासाठी अर्ज स्वीकारण्यात येणार आहेत. या नवीन मालिकेतील आकर्षक किंवा पसंतीचे क्रमांक राखीव ठेवण्यासाठी १८ नोव्हेंबर २०२६ रोजी मोटर कार व मालवाहू वाहन (दुचाकी वगळून) तसेच १९ नोव्हेंबर २०२६ रोजी दुचाकी वाहनासाठी सकाळी १०:३० ते दुपारी २:३० वाजेपर्यंत अर्ज व विहित शुल्काचा राष्ट्रीयकृत बँकेचा धनादेश (DD) 'RTO L-TUR' या नावाने स्वीकारण्यात येत आहेत.

एखाद्या विशिष्ट क्रमांकासाठी एकापेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यास, त्या आकर्षक क्रमांकाचा लिलाव २० नोव्हेंबर २०२६ रोजी दुपारी २ वाजता सह प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्या कक्षामध्ये केला जाईल. सदर लिलावात संबंधित अर्जदाराने वाढीव रकमेचा धनादेश सादर करणे बंधनकारक राहणार असून, ज्या अर्जदाराने जास्तीचा वाढीव रकमेचा धनादेश सादर केला जाईल, त्या अर्जदारास तो आकर्षक पसंती क्रमांक राखीव ठेवण्यात येईल याची संबंधित वाहनधारकांनी नोंद घ्यावी, असे प्रादेशिक परिवहन कार्यालयातर्फे कळविण्यात आले आहे.

विभागीयस्तरीय किकबॉक्सिंग स्पर्धेत अनन्या ढोबळे हिचे रौप्यपदक; रघुवंश पब्लिक स्कूलचा गौरव!

लातूर । संतोष सोनवणे

रघुवंश पब्लिक स्कूलची गुणवंत विद्यार्थिनी कु. अनन्या ढोबळे हिने विभागीयस्तरीय किकबॉक्सिंग स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत १४ वर्षांखालील ४६ किलो वजन गटात द्वितीय क्रमांक पटकावला असून रौप्यपदकाची मानकरी ठरली आहे. तिच्या या यशामुळे शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.



अनन्याने कठोर परिश्रम, जिद्द, चिकाटी आणि उत्कृष्ट खेळकौशल्याच्या जोरावर हे यश संपादन केले. क्रीडा क्षेत्रातील तिच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे रघुवंश पब्लिक स्कूलचा नावलौकिक वाढला असून तिच्या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे. या यशाबद्दल शाळेचे संस्थापक एस.आर. वाघमारे, अध्यक्ष सौ. एस.एस. वाघमारे, व्यवस्थापकीय संचालक प्रणव वाघमारे तसेच क्रीडा शिक्षक अमित पोतदार यांनी अनन्या ढोबळे हिचे अभिनंदन करून तिच्या पुढील क्रीडा वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. खेळातील मेहनत, जिद्द आणि आत्मविश्वासाच्या जोरावर अनन्याने मिळवलेले हे यश इतर विद्यार्थ्यांसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरत आहे.

राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाचे सदस्य रवी रामू कलोसे यांचा लातूर दौरा

लातूर । प्रतिनिधी

केंद्र शासनाच्या राष्ट्रीय सफाई आयोगाचे सदस्य रवी रामू कलोसे हे १८ व १९ नोव्हेंबर २०२६ रोजी लातूर जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.

श्री. कलोसे यांचे १८ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता लातूर येथे आगमन होईल व मुक्काम. १९ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता ते लातूर शहर महानगरपालिका येथील कॉन्फरन्स हॉलमध्ये जिल्हा पोलीस अधीक्षक, महानगरपालिका आयुक्त, जिल्हा शल्य चिकित्सक यांची सफाई कर्मचारी यांच्या प्रश्नांबाबत बैठक घेतील. दुपारी १ वाजता पत्रकारांशी संवाद साधतील. दुपारी ४ वाजता मोटारीने नांदेडकडे प्रयाण करतील.

सर सेनापती संताजी घोरपडे सारथी उद्योजकता विकास उपक्रमांतर्गत २१ नोव्हेंबरपर्यंत ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन

लातूर । प्रतिनिधी

छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे यांच्यामार्फत मराठा, कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा समाजातील युवक-युवतींसाठी 'सर सेनापती संताजी घोरपडे सारथी उद्योजकता विकास (इनक्युबेशन) उपक्रम' राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत पात्र युवक-युवतींना स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी आणि उद्योजकीय कौशल्ये विकसित करण्यासाठी तज्ज्ञांचे मार्गदर्शन व आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. इच्छुक उमेदवारांनी २१ नोव्हेंबर २०२६ रोजी सायंकाळी ६.१५ वाजेपर्यंत सारथीच्या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने अर्ज करावेत, असे आवाहन सारथी विभागीय कार्यालय उपव्यवस्थापकीय संचालक व उपजिल्हाधिकारी श्रीमती आम्रपाली कासोदेकर यांनी केले आहे.

महाराष्ट्र राज्यातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा या लक्षित गटातील समाजाचा सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक विकास साधण्यासाठी सारथी संस्थेची स्थापना करण्यात आली असून, संस्थेमार्फत विविध कल्याणकारी योजना व उपक्रम राबविले जातात. याच अनुषंगाने नवउद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी हा इनक्युबेशन उपक्रम हाती घेण्यात आला आहे. या उपक्रमासाठी पुणे, सोलापूर, कोल्हापूर, सांगली, बारामती, नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर आदी ठिकाणच्या एकूण १३ नामांकित इनक्युबेशन संस्थांची निवड करण्यात आली आहे. या निवडक १३ इनक्युबेशन सेंटरच्या माध्यमातून प्रत्येकी १० नवउद्योजकांना त्यांच्या नाविन्यपूर्ण उद्योजकीय संकल्पनांवर आधारित उद्योग उभारणीसाठी आवश्यक मार्गदर्शन आणि सहकार्य केले जाणार आहे. या उपक्रमाबाबतची सविस्तर माहिती, आवश्यक सूचना आणि संबंधित इनक्युबेशन संस्थांच्या स्वतंत्र लिंक सारथीच्या https://sarthi.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. तरी मराठा, कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा समाजातील जास्तीत जास्त इच्छुक युवक-युवतींनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा आणि उद्योजकतेच्या माध्यमातून स्वावलंबी होण्यासाठी या उपक्रमात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन श्रीमती कासोदेकर यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.


औसा उपविभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी कुमार चौधरी यांना निरोप; नवनियुक्त आयपीएस अधिकारी आरंक्षा यादव यांचे स्वागत

पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी दोन्ही अधिकाऱ्यांना दिल्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा; कुमार चौधरी यांच्या कर्तव्यनिष्ठेचा केला गौरव

औसा । प्रतिनिधी

औसा उपविभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. कुमार चौधरी यांची महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक येथे बदली झाल्याने त्यांना निरोप देण्यासाठी तसेच त्यांच्या जागी नवनियुक्त झालेल्या आयपीएस अधिकारी श्रीमती आरांक्षा यादव यांचे स्वागत करण्यासाठी आज दिनांक १७ नोव्हेंबर रोजी पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर येथे स्वागत व निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लातूरचे पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे होते.

यावेळी पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी कुमार चौधरी यांच्या कार्याचा गौरव करताना त्यांच्या कर्तव्यनिष्ठा, शिस्त, संयम आणि कामाप्रती असलेल्या समर्पणभावनेचा विशेष उल्लेख केला. यापूर्वी नाशिक शहर येथे एकत्र काम केल्याने चौधरी यांच्या कार्यपद्धतीची आपल्याला आधीपासूनच माहिती होती. लातूर येथे पोलीस अधीक्षक म्हणून रुजू झाल्यानंतर पुन्हा एकदा त्यांच्यासोबत काम करण्याची संधी मिळाल्याचा आनंद कुमार चौधरी यांनीही व्यक्त केला होता, अशी आठवण त्यांनी यावेळी सांगितली. कुमार चौधरी हे कर्तव्याप्रती अत्यंत तत्पर असून कोणत्याही प्रकारची परिस्थिती उद्भवल्यास ती अत्यंत धैर्याने, शांतपणे आणि संयमाने हाताळण्याचे कौशल्य त्यांच्यामध्ये आहे. कोणत्याही घटनेचे गांभीर्य ओळखून तत्परतेने निर्णय घेणे आणि परिस्थितीवर प्रभावीपणे नियंत्रण मिळविणे ही त्यांच्या कामाची वैशिष्ट्ये आहेत. विशेष म्हणजे, वेळेचे किंवा सुट्टीचे कोणतेही बंधन न ठेवता कर्तव्याची गरज भासल्यास ते तत्काळ घटनास्थळी धाव घेतात. प्रत्येक जबाबदारीमध्ये स्वतःचे शंभर टक्के योगदान देण्याचा त्यांचा सातत्यपूर्ण प्रयत्न राहिला आहे, असे गौरवोद्गार पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी काढले. कुमार चौधरी यांच्या या कार्यपद्धतीतून जिल्ह्यातील इतर पोलीस अधिकाऱ्यांनीही प्रेरणा घेऊन कर्तव्याप्रती अशीच निष्ठा, तत्परता आणि समर्पणभावना जोपासावी, असे आवाहनही पोलीस अधीक्षकांनी यावेळी केले. तसेच महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक येथे त्यांना पुढील जबाबदारीसाठी शुभेच्छा देऊन त्यांच्या भावी कारकिर्दीसाठी सदिच्छा व्यक्त केल्या.



यावेळी आपल्या मनोगतात कुमार चौधरी यांनी पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्यासोबत काम करण्याचा अनुभव अत्यंत आनंददायी आणि समाधानकारक असल्याचे सांगितले. आदरणीय पोलीस अधीक्षक साहेबांच्या मार्गदर्शनाखाली काम करण्याची संधी मिळाली, हे माझ्यासाठी आनंदाची बाब आहे. त्यांची काम करून घेण्याची पद्धत अत्यंत प्रभावी आणि शिस्तबद्ध आहे. त्यांनी सांगितलेल्या कार्यपद्धतीनुसार पोलीस सेवेत काम केल्यास कोणतीही अडचण येत नाही, तसेच आपल्यावर सोपविण्यात आलेली जबाबदारी शंभर टक्के पूर्ण करता येते, असा माझा अनुभव आहे. त्यामुळे लातूर येथे कार्यरत असताना मला कोणत्याही प्रकारची अडचण जाणवली नाही. पोलीस अधीक्षक साहेबांच्या मार्गदर्शनामुळे माझा येथील संपूर्ण कार्यकाळ अत्यंत आनंददायी आणि समाधानकारकपणे पार पडला, अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या.

याच कार्यक्रमात नवनियुक्त आयपीएस अधिकारी श्रीमती आरांक्षा यादव यांचे स्वागत करून पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी त्यांना आगामी कार्यकाळासाठी मार्गदर्शन केले. पोलीस सेवेत काम करताना प्रत्येक घटनेची गांभीर्याने आणि तत्परतेने दखल घेणे, घटनास्थळी स्वतः उपस्थित राहून परिस्थितीचे प्रत्यक्ष निरीक्षण करणे तसेच घटनास्थळावरील अगदी लहानसहान बाबींचाही बारकाईने अभ्यास करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

पोलीस सेवेत सुरुवातीचा हा कालावधी शिकण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असून या काळात पोलीस कामकाजातील मूलभूत बाबी आत्मसात करण्यावर विशेष भर द्यावा. पोलीस ठाण्यांना प्रत्यक्ष भेटी देऊन तेथील कामकाज, अभिलेख, नोंदवह्या आणि विविध प्रशासकीय व तपासविषयक प्रक्रियांची बारकाईने माहिती घ्यावी. पोलीस ठाण्याच्या पातळीवरील मूलभूत कामकाजाची सखोल समज निर्माण करून घ्यावी, असे मार्गदर्शन त्यांनी केले. आरांक्षा यादव यांना आगामी काळात वरिष्ठ पदावरील महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या पार पाडायच्या असून भविष्यात पोलीस अधीक्षक पदाची जबाबदारीही स्वीकारायची आहे. त्यामुळे सध्याचा अनुभव आणि शिकण्याचा कालावधी त्यांच्या भावी प्रशासकीय व पोलीस नेतृत्वाच्या दृष्टीने अत्यंत मोलाचा ठरणार आहे. प्रत्येक लहानसहान बाबीचे निरीक्षण करून अनुभवातून शिकत प्रभावीपणे काम करण्याचा प्रयत्न करावा, अशा शुभेच्छाही पोलीस अधीक्षकांनी दिल्या.

यावेळी आपल्या भावना व्यक्त करताना नवनियुक्त आयपीएस अधिकारी आरांक्षा यादव यांनी, पोलीस अधीक्षक कार्यालयात आपले अत्यंत आदराने आणि प्रेमाने स्वागत करण्यात आल्याबद्दल उपस्थित सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे आभार मानले. लातूर जिल्ह्यात काम करण्याची संधी मिळाल्याचा आनंद व्यक्त करताना आगामी काळात येथे काम करत असताना सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभेल, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. सर्वांच्या सहकार्याने आपल्यावर सोपविण्यात आलेली जबाबदारी प्रभावीपणे पार पाडण्याचा प्रयत्न करेन, अशी भावना त्यांनी यावेळी व्यक्त केली.

या स्वागत व निरोप समारंभास लातूर जिल्ह्यातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी तसेच विविध शाखांचे प्रभारी अधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या माध्यमातून एका कर्तव्यदक्ष अधिकाऱ्याच्या कार्याचा गौरव करताना नव्याने जबाबदारी स्वीकारणाऱ्या युवा आयपीएस अधिकाऱ्याला मार्गदर्शन आणि प्रोत्साहन देण्यात आले. दोन्ही अधिकाऱ्यांच्या पुढील पोलीस सेवेसाठी पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी शुभेच्छा व्यक्त केल्या.

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

PRGI.No.- MHMAR/26/A0270

नांदेड जिल्हा आवृत्ती — बुधवार दि.१८ नोव्हेंबर २०२६ — पान नं. ५

दक्षिण मध्य रेल्वे नांदेड विभागाच्या रेल्वे सुविधाचा लाभ घ्या : प्रवीण गायकवाड

मुदखेड । प्रतिनिधी

कार्तिकी एकादशी यात्रेनिमित्त आदिलाबाद – नांदेड–पंढरपूर दरम्यान ४ विशेष रेल्वे फेऱ्या भाविकांच्या अतिरिक्त गर्दीचे व्यवस्थापन करण्यासाठी दक्षिण मध्य रेल्वेने निर्णय घेतला आहे. नांदेड, पुर्णा, परभणी, गंगाखेड व परळी वैजनाथ मार्गे धावणार विशेष रेल्वे धावणार आहेत. कार्तिकी एकादशी यात्रेनिमित्त पंढरपूर येथे जाणाऱ्या भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेऊन दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागामार्फत आदिलाबाद ते पंढरपूर दरम्यान विशेष रेल्वेगाडी चालविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या विशेष रेल्वेगाड्यांमुळे महाराष्ट्राच्या मराठवाडा तसेच विदर्भातील भाविकांना पंढरपूर येथे जाण्यासाठी अतिरिक्त रेल्वे सुविधा उपलब्ध होणार आहे. ही विशेष रेल्वे आदिलाबाद, किनवट, बोधडी बुजुर्ग, सहस्रकुंड, हिमायतनगर, हदगाव रोड, भोकर, मुदखेड, हजूर साहिब नांदेड, पूर्णा, परभणी, गंगाखेड, परळी वैजनाथ, लातूर रोड, लातूर, धाराशिव, बार्शी टाउन आणि कुर्डुवाडी मार्गे पंढरपूरपर्यंत धावणार आहे.

१. रेल्वे क्रमांक ०७६२५ – आदिलाबाद ते पंढरपूर विशेष : हि विशेष रेल्वे दिनांक १९.११.२०२६ (गुरुवार) आणि २३.११.२०२६ (सोमवार) रोजी आदिलाबाद येथून सकाळी ०७:१५ वाजता प्रस्थान करेल. किनवट, बोधडी बुजुर्ग, सहस्रकुंड, हिमायतनगर, हदगाव रोड, भोकर, मुदखेड, हजूर साहिब नांदेड, पूर्णा जंक्शन, परभणी जंक्शन, गंगाखेड, परळी वैजनाथ, लातूर रोड, लातूर, धाराशिव, बार्शी टाउन, कुर्डुवाडी जंक्शन, मोडनिंब, पंढरपूर येथे मध्यरात्री ००:३० वाजता आगमन होईल. २. रेल्वे क्रमांक ०७६२६ – पंढरपूर ते आदिलाबाद विशेष : हि गाडी दिनांक २०.११.२०२६ (शुक्रवार) आणि २४.११.२०२६ (मंगळवार) रोजी पंढरपूर येथून रात्री २०:०० वाजता प्रस्थान करेल. आणि आलेल्या मागनिच आदिलाबाद येथे दुसऱ्या दिवशी दुपारी १२:०० वाजता आगमन करेल.

२४ डब्यांची विशेष रेल्वेगाडी

प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेऊन या विशेष रेल्वेला एकूण २४ डबे जोडण्यात येणार आहेत. कार्तिकी एकादशी यात्रेसाठी पंढरपूरला जाणाऱ्या भाविकांनी या विशेष रेल्वेसेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन भारत सरकारच्या दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागाचे नव नियुक्त सल्लागार समितीचे सदस्य प्रवीण गायकवाड यांनी केले आहे.

इसापूर धरणातून पैनगंगा नदीपात्रात पिण्यासाठी पाणी सोडा; पळसपूर ग्रामस्थांची जिल्हाधिकाऱ्यांकडे आर्त मागणी

भीषण पाणीटंचाईमुळे माणसे, जनावरे संकटात; गाव सोडून स्थलांतर करण्याची वेळ, जलसंधारणाची कामे सुरू करण्याचीही मागणी

नांदेड । प्रतिनिधी

हिमायतनगर तालुक्यातील पळसपूर गावात भीषण पाणीटंचाई निर्माण झाली असून, नागरिकांसह जनावरांचेही हाल होत आहेत. या पार्श्वभूमीवर इसापूर धरणातून पैनगंगा नदीपात्रात पिण्यासाठी पाणी सोडण्यात यावे, अशी आर्त मागणी पळसपूर ग्रामपंचायत विकास समिती व समस्त ग्रामस्थांच्या वतीने जिल्हाधिकारी, नांदेड यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. दि.१६ नोव्हेंबर २०२६ रोजी हे निवेदन सादर करण्यात आले.

पळसपूर परिसरात दुष्काळाची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असून, नदी, नाले आणि ओढे कोरडे पडले आहेत. पाण्याअभावी पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. जनावरांना चारा व पाणी मिळणे कठीण झाले असून, शेतकरी आणि शेतमजूर मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत. रोजगार व उदरनिर्वाहाचे साधन उपलब्ध नसल्याने अनेक कुटुंबांवर गाव सोडून इतर राज्यांत स्थलांतर करण्याची वेळ आली असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. पळसपूर हे गाव पैनगंगा नदीच्या काठावर वसलेले असतानाही गावकऱ्यांना पाण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे. इसापूर धरणाची निर्मिती झाल्यापासून या गावाला अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असल्याची खंत ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. धरणात पाणीसाठा वाढल्यानंतर नदीपात्रात पाणी सोडले जाते



आणि त्यामुळे गावाला पुराचा धोका निर्माण होतो. अनेकदा शेती पाण्याखाली जाऊन पिकांचे तसेच जनावरांचे नुकसान होते. मात्र, आज पिण्याच्या पाण्यासाठी याच नदीपात्रात पाणी सोडण्याची मागणी करण्याची वेळ ग्रामस्थांवर आली आहे.

दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी गावात तातडीने जलसंधारणाची कामे सुरू करावीत, रोजगारनिर्मितीची कामे हाती घ्यावीत आणि पिण्याच्या पाण्याचा कायमस्वरूपी प्रश्न सोडवावा, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे. ग्रामीण भागातील तरुणांना रोजगार उपलब्ध न झाल्यास ते व्यसनाधीनतेकडे वळण्याची भीती असून, नव्या पिढीचे शिक्षणही प्रभावित होण्याची शक्यता ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

गावात केवळ सातवीपर्यंत शाळा असल्याने पुढील शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना बाहेरगावी जावे लागते. पावसाळ्यात नाले व ओढ्यांना पाणी असल्यामुळे विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यास अडचणी येतात. गावातील बहुतांश कुटुंबांचा उदरनिर्वाह शेतीवर अवलंबून असल्याने शेती आणि पाणी या दोन्ही प्रश्नांवर शासनाने गांभीर्याने लक्ष देण्याची गरज असल्याचे ग्रामस्थांनी म्हटले आहे. इसापूर धरणातून पैनगंगा नदीपात्रात पिण्यासाठी पाणी सोडण्याबाबत तातडीने निर्णय घ्यावा, तसेच पळसपूर गावातील पाणीटंचाई, जलसंधारण, रोजगार आणि शैक्षणिक सुविधांच्या प्रश्नांकडे विशेष लक्ष द्यावे, अशी विनंती जिल्हाधिकाऱ्यांना करण्यात आली आहे.

या निवेदनाच्या प्रती जलसंपदा विभागाचे मुख्य अभियंता, छत्रपती संभाजीनगर (मुख्यालय नांदेड), अधीक्षक अभियंता, ऊर्ध्व पैनगंगा प्रकल्प मंडळ, नांदेड तसेच कार्यकारी अभियंता, ऊर्ध्व पैनगंगा प्रकल्प विभाग क्रमांक १, नांदेड यांनाही पाठविण्यात आल्या आहेत. पळसपूर ग्रामपंचायत विकास समितीच्या पुढाकारातून उत्तमराव रामा गायकवाड, नागोराव संभाजी शिंदे, पुंजाराम जगदेराव बोंबीलवार, बाबुराव गोविंदराव वानखेडे यांच्यासह एकूण ३० ग्रामस्थांनी या निवेदनावर सह्या करून गावाच्या पाणीप्रश्नाकडे प्रशासनाचे लक्ष वेधले आहे.

समान काम–समान वेतनासाठी न्यायालयीन कर्मचाऱ्यांचा राज्यव्यापी एल्गार! मुदखेड न्यायालयात शंभर टक्के संप

राज्यातील ३४ हजार न्यायालयीन कर्मचारी बेमुदत संपावर; अभिवक्ता संघाचाही आंदोलनाला जाहीर पाठिंबा

मुदखेड । अतिक अहमद

समान काम–समान वेतन या न्याय्य मागणीसाठी महाराष्ट्रातील सुमारे ३४ हजार दुय्यम न्यायालयीन कर्मचारी आज, मंगळवारपासून बेमुदत संपावर गेले आहेत. या राज्यव्यापी आंदोलनात दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, मुदखेड येथील सर्व कर्मचाऱ्यांनी शंभर टक्के सहभाग नोंदविला आहे. लिपिक, वरिष्ठ लिपिक, सहाय्यक अधीक्षक, लघुलेखक, बेलीफ तसेच चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांनी एकजुटीने संपात सहभागी होत आपल्या न्याय्य हक्कांसाठी लढा पुकारला आहे.

मुंबई उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांना सन २००६ पासून लागू असलेल्या सुधारित वेतनश्रेणीप्रमाणेच दुय्यम न्यायालयांतील कर्मचाऱ्यांनाही सुधारित वेतनश्रेणी लागू करावी, ही आंदोलनाची प्रमुख मागणी आहे. यासंदर्भात मुंबई उच्च न्यायालयाने ३१ जानेवारी २०२५ रोजी इंग्रजी जा. क्र. इ(त्रिशप)–१००१/२०२५/२५७ अन्वये सुधारित वेतनश्रेणीचा प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडे



पाठविला आहे. मात्र, सुमारे २२ महिने उलटूनही शासनाकडून अंतिम निर्णय घेण्यात आलेला नाही. चारही राज्यस्तरीय कर्मचारी संघटनांनी सातत्याने पाठपुरावा करूनही मागणी मान्य होत नसल्याने अखेर १७ नोव्हेंबरपासून बेमुदत संपाचा मार्ग स्वीकारण्यात आला आहे.

उच्च न्यायालय आणि दुय्यम न्यायालयांतील कर्मचाऱ्यांच्या कामाचे स्वरूप, जबाबदाऱ्या व न्यायप्रशासनातील योगदान समान असताना वेतनश्रेणीमध्ये तफावत का, असा सवाल कर्मचारी संघटनांनी उपस्थित केला आहे. अपुरे मनुष्यबळ, वाढती प्रलंबित प्रकरणे, संगणकीकरणासोबतच मॅन्युअल कामकाज आणि वाढता कामाचा ताण यामुळे कर्मचाऱ्यांवर मानसिक व शारीरिक ताण वाढत असल्याचेही संघटनांचे म्हणणे आहे.

या मागणीसाठी १६ सप्टेंबर तसेच १६ व १७ ऑक्टोबर रोजी राज्यभर काळ्या फिती लावून निषेध नोंदविण्यात आला होता. १७ ऑक्टोबर रोजी सेवानिवृत्त न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे धरणे आंदोलन केले होते. त्यानंतर ५ नोव्हेंबर रोजी प्रस्तावित सामुदायिक रजा आंदोलन तांत्रिक अडचणी टाळण्यासाठी मागे घेण्यात आले होते. मात्र, मागण्यांवर ठोस निर्णय न झाल्याने अखेर बेमुदत संप सुरू करण्यात आला आहे. मुदखेड न्यायालयातील एस. आर. आडे, श्रीमती स्वाती पवार, श्रीमती वर्षा कांबळे, नामदेव तेलंगे, आशिष कोंडूरकर, एस. एस. सरदार, श्रीमती सुमेधा वाघमारे, श्रीमती किरण हंबर्डे, एस. एस. लोणकर, एस. सी. कुऱ्हाडे, आर. के. सवई सोनकांबळे, एस. व्ही. मंडगे, बी. पी. ढेंबरे, माधव तेलंगे आदी कर्मचाऱ्यांनी संपात सहभाग नोंदविला आहे. विशेष म्हणजे, मुदखेड न्यायालयातील अभिवक्ता संघानेही समान काम–समान वेतनाच्या प्रमुख मागणीला जाहीर पाठिंबा दर्शविला आहे. 'आश्वासन नको, ठोस लेखी निर्णय हवा; समान काम–समान वेतन मिळालेच पाहिजे!' अशी ठाम भूमिका घेत कर्मचाऱ्यांनी शासनाचे लक्ष वेधले असून, शासनाने सुधारित वेतनश्रेणीच्या प्रस्तावावर तातडीने सकारात्मक निर्णय घेऊन न्याय द्यावा, अशी मागणी केली आहे. मुदखेड न्यायालयातील कर्मचाऱ्यांचा शंभर टक्के सहभाग हा कर्मचारी एकजूट, स्वाभिमान आणि न्याय्य हक्कांच्या लढ्याचा महत्त्वपूर्ण संदेश देणारा ठरला आहे.

पेनूर अंतेश्वर भारसवाडा या गोदाकाठच्या गावात १२ कोटीच्या कामाचा आ.चिखलीकरांच्या हस्ते शुभारंभ

लोहा । अशोक सोनकांबळे

लोहा तालुक्यातील पेनूर, अंतेश्वर, भारसवाडा ही तीन गावे गोदाकाठी वसली आहेत. या तिन्ही गावात अंतर्गत सिमेंट रस्ते व बंदिस्त नाली बांधकाम केले जाणार आहे. मंगळवारी (१७ नोव्हेंबर) सकाळी पेनूर येथे ४ कोटी ९९ लक्ष, अंतेश्वर गावात ३ कोटी ९९ लक्ष व भारसवाडा २ कोटी ९९ लक्ष अशी एकूण ११ कोटी ९७ लक्ष रुपयांच्या कामाचा शुभारंभ आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते गावकऱ्यांच्या साक्षीने करण्यात आला. विकास कोण करू शकते याची पारख असावी कोणाच्याही मागे धावत सुरू नका असा खोचक सवाल उपस्थित करत दुष्काळी परिस्थितीत पाणी व चारा जपून वापरावा संयमाने यानैसर्गिक संकटास सामोरे जाऊ यात, असे आवाहन आ प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी केले. पेनूर येथे कार्यक्रम अध्यक्ष गुरु आप्पा धोंडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला.



यावेळी आ. प्रतापराव पाटील चिखलीकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस प्रवीण पाटील चिखलीकर, तहसीलदार विठ्ठल परळीकर, नगराध्यक्ष शरद पवार, शिवसेना उपजिल्हा प्रमुख बाळू पाटील कऱ्हाळे, माजी सभापती आनंदराव ढाकणीकर, माजी उपनगराध्यक्ष दता वाले, खुशाल पाटील पांगरीकर, सा बां उपअभियंता सुमीत पाटील, जि.प. बांधकाम उपअभियंता शिवाजी राठोड, राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष छत्रपती स्वामी, मारोती एजगे, सुनील पेनूरकर, गटविकास अधिकारी मांजरमकर, नगरसेवक हरीभाऊ चव्हाण, सुरेश पाटील हिलाल, माजी सरपंच बाबाराव पाटील गवते, सतिश निखाते, तुकाराम दाढेल, केतन खिल्लारे, बाळु पाटील गवते, दत्ता वाले, राठोड, पेनूर नगरीचे सरपंच बाळू गवते, भारसावडा –माजी सरपंच गोपिनाथ हालगे, सरपंच नवनाथ हालगे, पेनुर सरपंच ज्ञानेश्वर पाटील गवते, माजी सरपंच गंगाधर पाटील गवते, एडके, गुत्तेदार पळसीकर उपस्थित होते.

आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी गोदा काठच्या पेनूर अंतेश्वर भारसावडा या तिन्ही गावात १२ कोटी रुपयाच्या कामाचा शुभारंभ केला तेथे उपस्थितांना संबोधित करताना म्हणाले की, गावाचा विकास करणाऱ्याच्या मागे ग्रामस्थांनी राहिले पाहिजे निवडणुकीत येणारे वारे कसे आहे हे ओळखता आले पाहिजे असे सांगून या तिन्ही गावात सिमेंट रस्ते व बंदिस्त नाल्या होणार आहेत विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही. दुष्काळी परिस्थितीत सर्वांनी संयमाने तोंड द्यावे पाणी व चारा यांचा जपून वापर करावा असे।प्रतिपादन आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी केले.

२० तारखेला उपमुख्यमंत्री सुनेत्रा वहिनी कंधार मध्ये

कंधार येथील उपजिल्हा रुग्णालयाच्या इमारती राज्यातील शासकीय वास्तूच्या उत्तम नमुना पैकी एक होय बांधकाम अतिशय चांगले व भव्य झाले आहे. २० नोव्हेंबर रोजी राज्याच्य उपमुख्यमंत्री सुनेत्रा वहिनी पवार कंधार येथे येणार आहेत त्याच्या हस्ते उपजिल्हा रुग्णालय इमारतीचे उद्घाटन होणार आहे. तेव्हा या कार्यक्रमाला सर्वांनी उपस्थित राहावे असे आवाहन आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी केले.

बस प्रवासात महिलेचे १ लाख ३८ हजारांचे दागिने लांबवले; भोकर पोलिसांत गुन्हा दाखल

भोकर । एजास कुरेशी

बस प्रवासादरम्यान प्रवाशांच्या सामानावर डल्ला मारण्याच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असल्याचे दिसत आहे. अशीच एक खळबळजनक घटना दुगाव फाटा ते भोकर दरम्यान घडली असून, बसने प्रवास करणाऱ्या एका ३५ वर्षीय महिलेच्या हातातील व बॅगेतील सोन्या–चांदीच्या दागिन्यांवर अज्ञात चोराने डल्ला मारला आहे. सुमारे १ लाख ३८ हजार रुपये किमतीचे हे दागिने चोरीला गेल्याने प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. याप्रकरणी ललिता शिवशंकर इक्कळे (वय ३५, रा. आदिलाबाद) यांनी भोकर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून, त्यांच्या तक्रारीवरून अज्ञात चोराविरोधात भारतीय न्याय संहिता (इछड) २०२३ च्या कलम ३०३(२) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी ललिता शिवशंकर इक्कळे या १३ नोव्हेंबर रोजी दुपारी १ ते ३:४५ वाजेच्या दरम्यान दुगाव फाटा येथून भोकरकडे जाणाऱ्या एका एसटी किंवा खाजगी बसमधून प्रवास करीत होत्या. बसमधील गर्दीचा किंवा प्रवासादरम्यानच्या गोंधळाचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने ललिता यांच्या बॅगेची झिप उघडून आतील सोन्या–चांदीचे दागिने अतिशय चलाखीने लांबवले. भोकरमध्ये उतरल्यानंतर बॅग तपासली असता दागिने गायब असल्याचे त्यांच्या लक्षात आले. या प्रकारामुळे त्यांना मोठा धक्का बसला. त्यांनी तात्काळ या घटनेची माहिती भोकर पोलीस ठाण्यात दिली.

ललिता इक्कळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून भोकर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ६०४/२०२६ अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला असून, या चोरीमागील नेमका चोरटा कोण? याचा कसून शोध घेतला जात आहे. संशयितांच्या हालचालींच्या आधारे पोलीस पुढील तपास करत आहेत. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल केळकर व हौसरे हे करीत आहेत.

प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण

दिवसाढवळ्या बस प्रवासात अशा प्रकारे लाखो रुपयांचे दागिने चोरीला जाण्याच्या या घटनेमुळे महिला प्रवाशांमध्ये भीतीचे आणि असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले आहे. बसस्थानक तसेच प्रवासादरम्यान मौल्यवान ऐवज आणि दागिन्यांची काळजी कशी घ्यावी, असा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होत असून पोलिसांनी अशा चोरट्यांवर कडक कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

सिरंजनी येथे घाणीचे साम्राज्य; नागरीकांचे आरोग्य धोक्यात!

ग्रामपंचायत प्रशासनाचे जाणिवपूर्वक दुर्लक्ष

हिमायतनगर । धम्मपाल मुनेश्वर

तालूक्यातील सिरंजनी येथे सर्वत्र घानीचे साम्राज्य पसरलेले आहे. जागोजागी कचर्याचे ढिगारे दिसून येत आहे. गावाअंतर्गत असणार्या नाल्या उपसल्या जात नसल्याने घान पाणी एका जागी दिवसेंदिवस साचून राहत असल्याने डासाच्या उत्पत्तीत लक्षणिय वाढ झाली असून डासांच्या उपद्रवाने नागरीक हैराण झाले आहेत. अनेकांना ताप,जुलाब व तसेच अन्य आजार जाणवू लागलेले आहेत. ग्रामपंचायतीच्या दुर्लक्षामुळे नागरीकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.



सिरंजनी येथे कर्तव्यावर असलेल्या ग्रामसेविका ह्या कधीतरी अमावस्या, पोर्णिमेला येथे येतात. आणि लगेच निघून जातात. नागरीकांना त्या भेटत नाहीत. अडीअडचनी जाणून घेत नाहीत. त्यामनमानी पद्धतीने कारभार चालवत आहेत. गावात सध्या घानीचे साम्राज्य पसरलेले आहे. नागरीक बेजार आहेत. अश्या अवस्थेत सिरंजनी सारख्या गावाला कर्तव्यदक्ष ग्रामसेवकाची गरज आहे. वरिष्ठांनी या गंभीर बाबींकडे जातीने लक्ष वेधून सिरंजनीला कर्तव्यदक्ष ग्रामसेवक देण्यात येवून येथे कित्येक वर्ष कर्तव्यावर असणार्या ग्रामसेविकेची तात्काळ उचलबांगडी करावी. अशी मागणी ग्रामस्थांतून पुढे आली आली आहे.

मुंबई उच्च न्यायालयाच्या धर्तीवर वेतनश्रेणी लागू करा; भोकर तालुका न्यायालयीन कर्मचाऱ्यांचा हुंकार

भोकर । एजास कुरेशी

महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघाशी संलग्न असलेल्या तालुका न्यायालयीन कर्मचारी संघटना, भोकर यांच्या वतीने आजपासून (मंगळवार, दि.१७ नोव्हेंबर २०२६) जिल्हा न्यायालय, दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर आणि कनिष्ठ स्तर न्यायालय आवारात बेमुदत कामबंद आंदोलन पुकारण्यात आले आहे. समान काम, समान वेतन या प्रमुख मागणीसाठी हे आंदोलन सुरू करण्यात आले असून, यामुळे न्यायालयाकडील दैनंदिन कामकाजावर परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

आंदोलनकर्त्या कर्मचाऱ्यांच्या मते, मुंबई उच्च न्यायालयाच्या कर्मचाऱ्यांप्रमाणेच राज्यातील इतर दुय्यम न्यायालयांमधील



कर्मचाऱ्यांनाही सुधारित वेतनश्रेणी तातडीने लागू करण्यात यावी, ही त्यांची प्रमुख व जुनी मागणी आहे. वारंवार निवेदने देऊनही शासनाकडून योग्य तो निर्णय घेतला जात नसल्याने अखेर नाईलाजास्तव न्यायालयातील कर्मचाऱ्यांना आक्रमक होत बेमुदत कामबंद आंदोलनाचा मार्ग पत्करावा लागला आहे.

'एकजूट हीच आमची ताकद'

न्याय मिळत नाही तोपर्यंत लढा सुरू ठेवण्याचा निर्धार यावेळी कर्मचाऱ्यांनी व्यक्त केला आहे. एकजूट हीच आमची ताकद! असा नारा देत भोकर येथील न्यायालयाच्या प्रांगणात सर्व कर्मचारी मोठ्या संख्येने या आंदोलनात सहभागी झाले आहेत. न्यायव्यवस्था सुरळीत चालवण्यात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या या कर्मचाऱ्यांच्या बेमुदत संपामुळे शासनाकडून यावर काय पावले उचलली जातात, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

राष्ट्रीय पत्रकार दिनानिमित्त पत्रकारांचा सन्मान; सामाजिक कार्यकर्ते धनाजी जोशी यांचा स्तुत्य उपक्रम

देगलूर । अजीम अन्सारी

लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पत्रकारितेच्या माध्यमातून समाजातील सर्वसामान्यांचे प्रश्न, गोरगरीबांच्या व्यथा, अन्याय–अत्याचार आणि विविध सामाजिक समस्यांना वाचा फोडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य पत्रकार बांधव सातत्याने करीत असतात. आपल्या लेखणीच्या माध्यमातून प्रशासनाला जाब विचारत जनतेच्या प्रश्नांकडे लक्ष वेधणाऱ्या पत्रकारांच्या कार्याची दखल घेत राष्ट्रीय पत्रकार दिनाचे औचित्य साधून देगलूर येथे सामाजिक कार्यकर्ते धनाजी मनोहर जोशी यांच्या वतीने पत्रकारांचा सन्मान करण्यात आला. यावेळी दैनिक लोकमतचे देगलूर प्रतिनिधी राजीव ताटे, महिमा खादीचा चे संपादक गजानन बिडकर, साप्ताहिक त्रिसंगम वार्ताचे संपादक शेख असलम, शिवगर्जनाचे संपादक शहाजी वरखिंडे, लोकमत्रचे तालुका प्रतिनिधी इर्शाद पटेल, लोकन्यायचे तालुका प्रतिनिधी इस्माईल खान पठाण, दैनिक त्रिशक्तीचे तालुका प्रतिनिधी शेख जावेद, जगमित्रचे देगलूर तालुका प्रतिनिधी आजीम अन्सारी तसेच देगलूर टीव्ही ेलचे प्रतिनिधी शेख सैफ यांच्यासह पत्रकार बांधव उपस्थित होते. पत्रकारिता आणि समाजकार्य यांचा परस्परांशी अतूट संबंध असून, समाजातील चांगल्या कार्याला प्रोत्साहन देतानाच अन्यायाविरुद्ध आवाज उठविणाऱ्या पत्रकारांच्या पाठीशी समाजाने उभे राहणे आवश्यक आहे.

स्मशानभूमीतील बाक तोडले, मग नागरिकांच्या सुविधांची जबाबदारी कोणाची? नगरपरिषद प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह!

आठ दिवसांत बाक पूर्ववत बसविण्याची महाविकास आघाडीची मागणी; मुदखेड । अतिक अहमद

मुदखेड शहरातील बारड रोडवरील हिंदू स्मशानभूमीत अंत्यसंस्कारासाठी येणाऱ्या नागरिकांच्या सोयीसाठी स्वर्गीय हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाने बसविण्यात आलेले बाक नगरपरिषद प्रशासनाच्या सांगण्यावरून तोडण्यात आल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. स्मशानभूमीत येणारे नातेवाईक व ज्येष्ठ नागरिक यांना बसण्यासाठी असलेली सुविधा हटविण्यामागील नेमके कारण काय? तसेच पर्यायी व्यवस्था का करण्यात आली नाही, असे सवाल उपस्थित करत महाविकास आघाडीने या प्रकाराचा तीव्र निषेध नोंदविला आहे. यासंदर्भात वारंवार सूचना करूनही बाक पूर्ववत बसविण्यात आले नसल्याने नागरिकांची गैरसोय कायम असल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिदिनानिमित्त महाविकास आघाडीच्या वतीने नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांना निवेदन देऊन सदर बाक पूर्वीच्या ठिकाणी



पुन्हा व्यवस्थित बसविण्याची मागणी करण्यात आली. येत्या आठ दिवसांत बाक पूर्ववत बसवून नागरिकांची गैरसोय दूर करावी, अन्यथा बारड रोडवरील हिंदू स्मशानभूमीत महाविकास आघाडीच्या वतीने एक दिवसीय लाक्षणिक उपोषण करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

यावेळी ठाकरे गटाचे अंकुश मामीडवार, काँग्रेसचे गिरीश कोत्तावार, नगरपरिषद गटनेते प्रतिनिधी मुजीब पठाण, शिवानंद देवके, वेदांत शेवटे, गजानन पांचाळ, अनीस भाई, आकाश आरेवाड, शिलवंत डोंगरे, अविनाश शर्मा, श्रीनिवास पांचाळ यांच्यासह महाविकास आघाडीचे पदाधिकारी उपस्थित होते. स्मशानभूमीसारख्या संवेदनशील ठिकाणी नागरिकांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे ही नगरपरिषद प्रशासनाची जबाबदारी असताना उपलब्ध सुविधा हटविण्याचा निर्णय कोणाच्या आदेशाने घेण्यात आला आणि बाक पुन्हा बसविण्यास विलंब का होत आहे, याचे स्पष्टीकरण प्रशासनाने द्यावे, अशी मागणी होत आहे. आता महाविकास आघाडीच्या आठ दिवसांच्या अल्टिमेटमनंतर नगरपरिषद प्रशासन काय भूमिका घेते, याकडे मुदखेडकरांचे लक्ष लागले आहे.

शैक्षणिक कागदपत्रे हरवली आहे

शिशुपाल गंभीरा जाधव यांची १० वी मार्कमेमो, १२ वी मार्कमेमो, नॉन क्रिमीलीअर, जातीचे प्रमाणपत्र, टी.सी. ओरीजनल हे नांदेड ते भोकर प्रवासादरम्यान हरवले आहे. सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

शिशुपाल गंभीरा जाधव
रा.आमठाणा ता.भोकर जि. नांदेड
मो.नं.९३२२९२७५५२

जगमित्र हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक, संपादक इलासाहे जिजाराम कडबाने यांनी जगमित्र ऑफसेट, बाजीप्रभू नगर जवळ नेहरू चौक परळी वै. ता.परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक जगमित्र कार्यालय, ९–२–३४६, बिलाल नगर, देगलूर नाका, इतवारा, नांदेड महाराष्ट्र ४३१६०४ येथे प्रकाशित केले. (दैनिकातील मजकूर बातम्या बाबत संपादक सहमत असतीलच असे नाही.* पीआरबी कायद्यानुसार मजकूर निवडण्याची जबाबदारी यांचेवर राहील. Email:-jagmitra2010@gmail.com

PRGI.No.- MHMAR/26/A0270

Jagmitra, this newspaper, is printed, published, owned, and edited by Balasaheb Jijaram Kadbane at Jagmitra Offset, near Bajiprabhu Nagar, Nehru Chowk, Parli Vai., Taluka Parli Vai., District Beed (Maharashtra) and published from the Daily Jagmitra office, 9-2-346, Bilal Nagar, Deglur Naka, Itwara, Nanded, MAHARASHTRA - 431604. (The editor may not necessarily agree with the content and news in the daily newspaper. *According to the PRB Act, the responsibility for selecting the content rests with them.) Email:-jagmitra2010@gmail.com

PRGI.No.- MHMAR/26/A0270

18 Nov 2026_Layout 1 11/17/2026 11:07 PM Page 2

सोनपेठ जिल्हा मध्यवर्ती बँकशाखा दुसऱ्या मजल्यावर असल्यामुळे अंध अपंग वयोवृद्ध शेतकऱ्यांना व्यवहारासाठी ठरत आहे बाधक

सोनपेठ/सुभाष सावंत

सोनपेठ शहर व तालुक्यातील शेतकरी शेतमजूर अंध, अपंग व्यक्ती , महिला बचत गट या सर्वांचे व्यवहार जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या सोनपेठ शाखेत आहेत. ही बँक दुसऱ्या मजल्यावर कार्यरत असल्यामुळे या बँकेत शहरातील व तालुक्यातील निम्म्यापेक्षा जास्त गावातील शेतकऱ्यांचे व शासनाच्या निराधार योजनेतील लाभार्थी यांची खाती आहेत. पूर्वी नरवाडी या गावी असलेली जिल्हा बँकेची शाखा सुद्धा या बँकेत विलीन केल्यामुळे त्या बँकेतील खातेदारांचा अधिकचा भार सुद्धा सोनपेठ शाखेवर आलेला आहे. शासनाच्या निराधार योजनेतील बहुतांश लाभार्थी हे वयोवृद्ध , अंध अपंग, निराधार असतात. यांना आपले आर्थिक व्यवहार करण्यासाठी या बँकेत सत्तर यावे लागते परंतु बँक दुसऱ्या मजल्यावर असल्यामुळे इतरांचा सहारा



घेऊन किंवा कोणाला उचलून घेऊन बँकेत न्यावे लागते. त्यांच्यावर होत असलेला अन्याय जिल्हा बँक प्रशासन यावर काही ठोस पर्याय शोधून तोडगा काढून न्याय देईल का अशी मागणी वयोवृद्धांन कडून होत आहे. निराधार

बँकेची ए टी एम सतत बंदच?

मानधन वाटपाच्या वेळी तळमजल्यावर एखादे काउंटर उघडून त्यांना त्यांच्या मानधनाची व बायोमेट्रिक पद्धतीची पडताळणी खाली जमीन लेवलच्या एखाद्या गाड्यांमध्ये करावी अशी मागणी होत आहे. सोनपेठ जिल्हा बँकेने त्यांच्या खातेदारांना एटीएम वाटप केलेले आहेत परंतु त्यांचे एटीएम मशीन हे सतत बंद असल्यामुळे कर्मचाऱ्यांवरती अधिकचा भार येतो व बँकेत विनाकारण गोंधळ निर्माण होतो या गोंधळाचा चोरटे व पाकीटमार या गर्दीचा फायदा घेऊन पाकीट मारी करत आहेत बँक प्रशासन तात्काळ एटीएम मशीन चालू करून सर्वसामान्य खातेधारकांना न्याय देईल का?असा प्रश्न सामान्य नागरिकांतून उपस्थित होत आहे.

वैद्यनाथ मंदिरासमोर धनुभाऊंचा सेल्फी... अन् सेल्फी पॉईंट झाला व्हायरल

परळी वैजनाथ/प्रतिनिधी

माजी मंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आ. धनंजय मुंडे यांनी आज परळीतील पाचवे ज्योतिर्लिंग प्रभू वैद्यनाथ मंदिराच्या आवारात उभारण्यात आलेल्या सेल्फी पॉईंट व भव्य त्रिशूळ ठिकाणी सेल्फी काढला अन् काही मिनिटातच तो फोटो व्हायरल झाला.

धनुभाऊंचा सेल्फी व्हायरल झाला अन् या सेल्फी पॉईंटला येऊन सेल्फी काढण्यासाठी आता स्थानिक नागरिक तसेच मंदिरात दर्शनाला येणारे भाविक देखील गर्दी करत असल्याचे पाहायला मिळाले.



धनंजय मुंडे यांच्या पुढाकारातून या वैद्यनाथ मंदिर व परिसराचे ३०१ कोटी रुपयांच्या आराखड्यातील अनेक विकासकामे सध्या सुरू आहेत. मुख्य प्रवेश द्वार, दगडी पायऱ्या, स्वागत कमानी, भव्य दर्शन मंडप, पूर्णत्वास आलेले भव्य भक्त निवास अशी अनेक कामे सध्या पूर्णत्वाकडे जात आहेत. दरम्यान धनुभाऊंनी आज सेल्फी काढलेला सेल्फी पॉईंट आज चांगलाच व्हायरल झाला असून तिथे सेल्फी काढण्यासाठी गर्दी झाल्याचे पाहायला मिळाले.

शेतकरी वृद्ध दाम्पत्याला मारहाण करत जीवे मारण्याची धमकी

ग्रामीण पोलिसांत राजेंद्र आनंदगावकर यांच्याविरुद्ध अदखलपात्र गुन्हा दाखल

माजलगाव/प्रतिनिधी

शेतातील रस्त्यावरून ये-जा करण्याच्या कारणावरून झालेल्या वादातून वृद्ध दाम्पत्याला शिवीगाळ करून मारहाण केल्याची घटना मंजरथ (ता. माजलगाव) येथे १५ नोव्हेंबर रोजी सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास घडली. याप्रकरणी राजेंद्र गोविंदराव आनंदगावकर यांच्याविरुद्ध माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात अदखलपात्र गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. याबाबत मिळालेल्या पोलीस तक्रारीनुसार, मनाबी गुलाब सय्यद (वय ६०, रा. मंजरथ) या पती गुलाब सय्यद यांच्यासह त्यांच्या गट क्रमांक १७ मधील शेतात कापूस वेचण्याचे काम करीत होत्या. यावेळी शेजारील शेत असलेले राजेंद्र आनंदगावकर तेथे आले. त्यांनी शेतातील रस्त्यावरून जाऊ नका, असे म्हणत वाद घातला. या वादातून त्यांनी तक्रारदार महिला व त्यांच्या पतीला शिवीगाळ करून लाथाबुक्क्यांनी व चापटांनी मारहाण केल्याचे तक्रारीत नमूद आहे. तसेच यापुढे रस्त्याने गेल्यास जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोपही तक्रारीत करण्यात आला आहे. घटनेनंतर मुलगा बाबूलाल याला माहिती देण्यात आली. त्यानंतर कुटुंबीयांसह माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार दाखल करण्यात आली. या प्रकरणी पोलिसांनी भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम ११५ (२), ३५२ आणि ३५१ (२) अन्वये अदखलपात्र गुन्ह्याची नोंद केली आहे. पुढील कार्यवाही माजलगाव ग्रामीण पोलीस करीत आहेत.

परळीच्या भूमिपुत्राची ठाणे जिल्ह्यात आरोग्यसेवेत उल्लेखनीय कामगिरी

डॉ.रवींद्र जगतकर यांच्या समन्वयातून आरोग्य योजनांचा हजारो रुग्णांना लाभ; वर्षभरात ३०२ कोटींच्या उपचारांना पूर्वमंजुरी

परळी वैजनाथ/प्रतिनिधी

परळी वैजनाथच्या भूमिपुत्राने ठाणे जिल्ह्यात आरोग्यसेवेच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण जबाबदारी सांभाळत आपल्या कार्याचा ठसा उमटविला आहे. डॉ. रवींद्र जगतकर हे एकत्रित महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना व आयुष्मान भारत-पंतप्रधान जनआरोग्य योजनेचे ठाणे जिल्ह्यातील वरिष्ठ जिल्हा समन्वयक म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या समन्वयातून हजारो गरजू रुग्णांना शासकीय आरोग्य योजनांचा लाभ मिळत असून, परळीच्या भूमिपुत्राच्या या कार्याची विशेष दखल घेतली जात आहे.



महागडे उपचार, गंभीर आजार आणि मोठ्या शस्त्रक्रियांचा खर्च सर्वसामान्य कुटुंबांना परवडणारा नसतो. अशा रुग्णांना आर्थिक आधार देण्यासाठी महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना आणि आयुष्मान भारत योजना महत्त्वपूर्ण ठरत आहेत. या योजनांअंतर्गत पात्र कुटुंबांना वर्षाला पाच लाख रुपयांपर्यंत आरोग्य संरक्षण मिळते.

ठाणे जिल्ह्यात २०२५-२६ या आर्थिक वर्षात ९५ हजार १५० उपचार प्रकरणांना ३०२.६२ कोटी रुपयांची पूर्वमंजुरी देण्यात आली आहे. तसेच ९२ हजार ३५९ उपचार प्रकरणांचे २९४.१५ कोटी रुपयांचे दावे सादर करण्यात आले आहेत. या आकडेवारीवरून जिल्ह्यात आरोग्य योजनांचा मोठ्या प्रमाणावर लाभ घेतला जात असल्याचे स्पष्ट होते.

या योजनांसाठी ठाणे जिल्ह्यातील ३१४ शासकीय व खासगी रुग्णालये आणि आरोग्य केंद्रांचा समावेश आहे. यामध्ये १९२ सार्वजनिक क्षेत्रातील, तर १२२ खासगी रुग्णालयांचा समावेश आहे. हृदयविकार, कर्करोग, मूत्रपिंडांचे आजार आणि विविध गंभीर शस्त्रक्रियांसाठी पात्र (पान २ वर)

दिव्यांगांना तुटपुंज्या पेन्शनवर जगवणार किती दिवस; आता तरी थेट ६ हजार रुपये पेन्शन द्या!

आ.विजयसिंह पंडित यांची मंत्री अतुल सावे यांच्याकडे मागणी

गेवराई/प्रतिनिधी

महागाईचा आगडोंब उसळला असताना राज्यातील दिव्यांग बांधवांना मिळणारे अवघे अडीच हजार रुपयांचे मासिक अर्थसहाय्य त्यांच्या जगण्यासाठी पुरेसे आहे. औषधोपचार, किराणा, प्रवास आणि दैनंदिन गरजा भागवायच्या तरी कशा? दिव्यांगांनी सन्मानाने जगायचे तरी कसे? असे प्रश्न उपस्थित करत गेवराई विधानसभा मतदारसंघाचे आमदार विजयसिंह पंडित यांनी दिव्यांगांच्या मासिक मानधनात थेट पाच ते सहा हजार रुपयांपर्यंत वाढ करण्याची मागणी केली आहे. यासंदर्भात त्यांनी दिव्यांग सक्षमीकरण मंत्री अतुल सावे यांना दि. १६ नोव्हेंबर रोजी लेखी निवेदन सादर केले आहे.

राज्यातील दिव्यांग बांधवांना सध्या मिळणारे २,५०० रुपयांचे मासिक अर्थसहाय्य वाढत्या महागाईच्या तुलनेत अत्यंत अपुरे आहे. दैनंदिन गरजा भागवतानाच दिव्यांगांना अनेक आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. अनेकांना औषधोपचार आणि इतर मूलभूत गरजांसाठीही आर्थिक तडजोड करावी लागते. अशा परिस्थितीत सध्याचे मानधन वाढवून किमान पाच ते सहा हजार रुपये करण्यात यावे, अशी ठाम मागणी आमदार पंडित यांनी केली आहे. दिव्यांग बांधवांना केवळ तुटपुंजे अर्थसहाय्य देऊन त्यांच्या समस्या सुटणार नाहीत. त्यांना सन्मानाने जीवन जगता यावे, आर्थिक स्वावलंबन मिळावे आणि समाजाच्या मुख्य प्रवाहात येण्यासाठी आवश्यक आधार मिळावा, यासाठी शासनाने ठोस धोरणात्मक निर्णय घेणे गरजेचे आहे. दिव्यांगांसाठी



असलेल्या राखीव निधीचा प्रभावी वापर करून त्यांना घरकुल, शिक्षण, आरोग्य आणि स्वयंरोजगाराच्या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे.

विशेष म्हणजे, दिव्यांगांच्या सक्षमीकरणासाठी निधीची तरतूद असतानाही त्याचा प्रभावी वापर होतो का, हा प्रश्न महत्त्वाचा आहे. दिव्यांगांच्या नावावर असलेला निधी त्यांच्या प्रत्यक्ष जीवनात बदल घडवण्यासाठी खर्च झाला पाहिजे. केवळ कागदोपत्री योजना आणि घोषणांपेक्षा दिव्यांगांच्या हातात आर्थिक मदत आणि प्रत्यक्ष सुविधा पोहोचणे आवश्यक आहे. आमदार विजयसिंह पंडित यांनी उपस्थित केलेला हा प्रश्न केवळ गेवराई मतदारसंघापुरता (पान २ वर)

सर्वोच्च न्यायालयाची रु.३२७ कोटींच्या विमा प्रकरणी कंपनीला नोटीस!

धाराशिव/प्रतिनिधी

जिल्ह्यातील २ लाख २७ हजार शेतकरी बांधवांच्या ३२७ कोटी रुपयांच्या खरीप २०२१ च्या पीक विमा प्रकरणी सर्वोच्च न्यायालयात सोमवारी महत्त्वाची सुनावणी झाली आहे. शेतकऱ्यांची बाजू ऐकून घेत सर्वोच्च न्यायालयाने विमा कंपनीला नोटीस बजावली आहे. त्यामुळे २०२१ पासून नुकसान भरपाईची प्रतीक्षा करणाऱ्या शेतकरी बांधवांच्या कायदेशीर लढाईचे एक महत्वपूर्ण पाऊल पुढे पडले असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली. खरीप २०२१ मध्ये अतिवृष्टीमुळे धाराशिव जिल्ह्यातील (पान २ वर)

"हे एसबीआय एटीएम आहे की चहाचे हॉटेल? एटीएममध्ये पैसे नाहीत, मात्र परिसरात चहाची दुकाने थाटलेली!"

नागरिकांच्या पदरी निराशाच; वारंवार चकरा मारूनही उपयोग नाही!

पालम/अनिस खुरेशी

पालम शहरातील एकमेव असलेले एटीएम मध्ये पैसेच नसल्याबद्दल नागरिकांची नाराजीचा सूर व संतापाचा तीव्र उद्रेक निर्माण झाला आहे.

भारतीय स्टेट बँकेच्या (एसबीआय) एटीएममध्ये पैसे उपलब्ध नसल्याने नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. सणासुदीच्या काळात खरेदी, घरगुती खर्च तसेच इतर आवश्यक कामांसाठी पैशांची गरज असताना एटीएममध्येच खडखडाट असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

एटीएममध्ये पैसे काढण्यासाठी येणाऱ्या नागरिकांना पैसे नसल्यामुळे रिकाम्या हाताने परतावे लागत आहे. पैसे काढण्यासाठी नागरिकांना वारंवार एटीएमच्या चकरा माराव्या लागत असून, यामुळे नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त केली जात आहे.

एकीकडे बँकिंग सेवा डिजिटल होत असल्याचा दावा केला जात असताना दुसरीकडे ऐन सणासुदीच्या



काळात एटीएममध्ये रोख रक्कम उपलब्ध नसणे ही गंभीर बाब आहे. संबंधित बँक प्रशासनाने याकडे तातडीने लक्ष देऊन एटीएममध्ये नियमित रोख रक्कम उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

भगवान बिरसा मुंडा जयंतीनिमित्त जनजाती गौरव दिन सप्ताह साजरा

धारूर/अतूल शिनगारे

आदिवासी समाजाचे जननायक आणि क्रांतीसूर्य भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त जनजाती गौरव दिन सप्ताहांतर्गत धारूर तालुक्यातील चोरंबा येथे विशेष शासकीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हा परिषद बीड कृषी विभाग आणि पंचायत समिती कृषी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम पार पडला.

या कार्यक्रमास तालुका कृषी अधिकारी जनार्दन भगत यांच्यासह कृषी विभागाचे अधिकारी व कर्मचारी, चोरंबा येथील सरपंच , उपसरपंच, पोलीस पाटील महादेव रिड्डे, तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी भगवान बिरसा मुंडा यांच्या कार्याचे स्मरण करून आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शासनाच्या विविध विभागांमार्फत राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनांची माहिती देण्यात आली. या



योजनांचा लाभ समाजातील पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी संबंधित विभागांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन करण्यात आले. तसेच नागरिकांनी शासकीय योजनांची माहिती घेऊन त्यांचा लाभ मिळवण्यासाठी सक्रिय सहभाग नोंदवावा, असेही यावेळी सांगण्यात आले.जनजाती गौरव दिन सप्ताहाच्या माध्यमातून आदिवासी समाजात शासकीय योजनांविषयी जनजागृती करण्याचा प्रयत्न या कार्यक्रमातून करण्यात आला.

नेपाळमधील कर्करोगग्रस्त रुग्णावर माजलगावात यशस्वी शस्त्रक्रिया

सीमा वेगळी, भाषा वेगळी; पण वेदना एकच; शासकीय योजनेच्या मर्यादा ओलांडून डॉ.यशवंत राजेभोसलेंनी जपला माणुसकीचा धर्म

माजलगाव/प्रतिनिधी

कर्करोगासारख्या गंभीर आजारावरील उपचारांसाठी मुंबई, पुणे, हैद्राबादसारख्या महानगरांकडे धाव घेण्याचे दिवस आता बदलण्याची आशादायी सुरुवात माजलगावातून झाली आहे. नेपाळमधील एका कर्करोगग्रस्त रुग्णाने उपचारासाठी थेट माजलगाव गाठले. मालीपारगाव येथील गुरुकृपा होलिस्टिक कॅन्सर वेलनेस आरोग्यधाम अंतर्गत यशवंत रुग्णालयातील डॉक्टरांनी कर्करोगाच्या ट्युमरची यशस्वी शस्त्रक्रिया केली. शासकीय योजनांच्या लाभाच्या मर्यादा असतानाही एका परदेशी रुग्णाच्या वेदना समजून घेत डॉ. राजेभोसले यांच्या टीमने माणुसकीचा धर्म जपला. थेट परदेशातील रुग्णाने उपचारासाठी माजलगावसारख्या ग्रामीण भागाची निवड करण्याची ही पहिलीच घटना ठरली आहे.

नेपाळमध्ये कर्करोगावर उच्चदर्जाचे उपचार उपलब्ध नसल्याने रुग्णाने भारतात उपचार घेण्याचे ठरविले; परंतु नवी दिल्ली येथील रुग्णालयात शस्त्रक्रियेसाठी ५ ते ७ लाख रुपयाचा खर्च लागणार असल्याचे रुग्णाला सांगण्यात आले.



त्यानंतर रुग्णाला माजलगाव येथील 'गुरुकृपा आरोग्यधाम'ची माहिती मिळाली. गुरुकृपाचे संस्थापक डॉ. यशवंत राजेभोसले यांनी शासकीय योजनेचा विचार न करता रुग्णावर अत्यल्प खर्चात उपचार करण्याचे ठरवले. रुग्ण नेपाळमधून भारतात आल्यानंतर छत्रपती संभाजीनगर विमानतळावर रुग्णाचे आगमन झाले. गुरुकृपा आरोग्यधामचा आरोग्य रथ आणि डिजिटल आरोग्य वाहिनीच्या माध्यमातून त्याला थेट माजलगाव येथे आणण्यात आले; परंतु भारत सरकारच्या आरोग्यविषयक योजनांचा लाभ परदेशी नागरिकाला मिळणे शक्य नसल्याने या रुग्णाला उपचार देण्यास अनेक मर्यादा होत्या. अशा परिस्थितीत जागतिक आरोग्यसेवेचा सेवाभाव डोळ्यांसमोर ठेवून डॉ. यशवंत राजेभोसले यांनी पुढाकार घेतला आणि तज्ञ डॉक्टरांच्या पथकाने रुग्णावर यशस्वी शस्त्रक्रिया केली. प्रसिद्ध सर्जन डॉ. युवराज कोल्हे, डॉ. महेश काळे, भूलतज्ञ डॉ. शिवाजीराव काकडे, हृदयरोगतज्ञ डॉ. यशवंत राजेभोसले यांनी संबंधित रुग्णाच्या मोठ्या आतड्याला झालेल्या कर्करोगाची तब्बल दोन तास शस्त्रक्रिया करून यशस्वी केली. या घटनेमुळे माजलगावच्या आरोग्यसेवेची ओळख आता देशाच्या सीमा ओलांडून परदेशापर्यंत पोहोचली आहे. ग्रामीण भागातही दर्जेदार उपचारांची सुविधा उभी राहू शकते, याचा विश्वास या घटनेने निर्माण केला आहे. गुरुकृपा कॅन्सर आरोग्यधाम भविष्यात ग्रामीण भागातील सर्वसामान्य कॅन्सरग्रस्त रुग्णांसाठी संजीवनी ठरण्याच्या दिशेने हि पहिले पाउल आहे. गंभीर आजारावरील उपचारांसाठी महानगरांमध्ये जाऊन लाखो रुपये (पान २ वर)

तब्बल २८ वर्षांनंतर वैद्यनाथ विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात संपन्न!

जुन्या आठवणींना उजाळा; गुरुजनांच्या उपस्थितीने स्नेहमेळाव्याला लाभली विशेष रंगत!

परळी वैजनाथ/प्रतिनिधी

येथील वैद्यनाथ विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचा तब्बल २८ वर्षांनंतर स्नेह मिलन सोहळा रविवार, दि. १५ नोव्हेंबर २०२६ रोजी मोठ्या उत्साहात आणि आनंदी वातावरणात संपन्न झाला. अनेक वर्षांनंतर एकत्र आलेल्या मित्र-मैत्रिणींच्या चेहऱ्यावर आनंद, उत्साह आणि जुन्या आठवणींचा भाव ओसंडून वाहत होता.

या स्नेहमेळाव्याचे विशेष आकर्षण म्हणजे विद्यार्थ्यांना घडविणारे आदरणीय शिक्षक ईटके सर, साठे सर, गाडे सर, घाडगे सर, चुंबळकर सर आणि अजय सर यांची लाभलेली उपस्थिती. आपल्या लाडक्या विद्यार्थ्यांना तब्बल २८ वर्षांनंतर एकत्र पाहून शिक्षकांनीही आनंद व्यक्त केला. यावेळी शिक्षकांनी विद्यार्थ्यांना



मोलाचे मार्गदर्शन केले तसेच शालेय जीवनातील आठवणींना उजाळा दिला. शालेय जीवनातील गमतीजमती, वर्गातील धमाल, शिक्षकांचे मार्गदर्शन, मधल्या सुट्टीतील मजा, खेळाचे क्षण आणि बालपणीच्या अविस्मरणीय आठवणींना यावेळी उजाळा देण्यात आला. तब्बल २८ वर्षांनंतर भेटलेल्या मित्र-मैत्रिणींनी एकमेकांची आस्थेने विचारपूस केली. प्रत्येकाने आपल्या जीवनातील अनुभव, यश आणि संघर्षाचा प्रवास मनमोकळेपणाने सांगितला. काळाच्या ओघात प्रत्येकजण आपापल्या संसारात, व्यवसायात आणि नोकरीत व्यस्त झाला होता. मात्र या स्नेहमेळाव्यामुळे सर्वजण पुन्हा एकदा शालेय जीवनात रममाण झाले. हास्य-विनोद, गप्पागोष्टी, आठवणींची देवाणघेवाण आणि स्नेहभोजनामुळे संपूर्ण वातावरण आनंदमय झाले होते. या सोहळ्यामुळे २८ वर्षांचे अंतर क्षणात मिटले आणि गुरुजन व विद्यार्थ्यांमधील जिव्हाळ्याचे नाते पुन्हा एकदा अनुभवायला मिळाले. भविष्यातही असे स्नेहमेळावे नियमित आयोजित करून मैत्रीचे बंध अधिक दृढ करण्याचा संकल्प सर्व मित्रमंडळींनी केला. शाळा सुटली, वर्ग सुटले, काळ बदलला; पण गुरुजनांचे आशीर्वाद आणि मैत्रीचे नाते मात्र कायम राहिले, याची सुंदर प्रचिती या स्नेहमेळाव्यातून आली.

प्रा.डॉ.विवेक आशा घन:श्याम घोबाळे यांना प्रतिष्ठित राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार-२०२६ प्रदान



अंबाजोगाई/प्रतिनिधी

महात्मा जोतिराव फुले राष्ट्रीय शिक्षण परिषद, महाराष्ट्र यांच्या वतीने नुकत्याच पार पडलेल्या राष्ट्रीय शिक्षण परिषद व शिक्षक पुरस्कार सोहळ्यात, शैक्षणिक, साहित्यिक आणि संशोधनात्मक क्षेत्रात उत्कृष्ट व उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल प्रा. प्राचार्य तथा सहायक प्राध्यापक प्रा. डॉ. विवेक आशा घनःश्याम घोबाळे यांना राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार-२०२६ प्रदान करण्यात आला.

शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात निरंतर कार्य करणाऱ्या डॉ. विवेक घोबाळे यांच्या कार्याची दखल घेऊन हा सन्मान करण्यात आल्याने त्यांच्यावर सर्वच स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

मान्यवरांच्या उपस्थितीत सोहळा संपन्न हा मानाचा पुरस्कार सोहळा श्रीमंत श्री. भूषणसिंह राजे होळकर, ॲड. पाटील, मा. गिरीशभाऊ जाधव, महात्मा जोतिराव फुले राष्ट्रीय शिक्षण परिषदेचे प्रदेशाध्यक्ष मा. व्यंकट जाधव आणि इतर मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत व अत्यंत उत्साही वातावरणात पार पडला.

परिवारजनांची विशेष उपस्थिती या दिमाखदार पुरस्कार सोहळ्यास सौ. शिल्पा विवेक घोबाळे, विनया घोबाळे, गौतमी घोबाळे व हर्ष घोबाळे यांच्यासह घोबाळे परिवार उपस्थित होता. पुरस्कार स्वीकारल्यानंतर डॉ. विवेक घोबाळे यांच्यावर मित्रपरिवार, नातेवाईक आणि शैक्षणिक क्षेत्रातील दिग्गजांकडून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

जगमित्र हे पत्र मुद्रक, प्रकाशन, मालक, संपादक बालासाहेब जिजाराम कडबाने यांनी जगमित्र ऑफसेट, बाजीप्रभू नगर जवळ नेहरू चौक परळी वै. ता.परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक जगमित्र कार्यालय, 'जगमित्र' बाजीप्रभू नगर नेहरू चौक (तळ) परळी वैजनाथ ४३१५१५ जि.बीड तर दैनिक जगमित्र कार्यालय घर क्र.२०, खडगाव रोड, क्रांतीनगर, विश्वशांती बौध्द विहार जवळ लातूर घर क्र.२२/२० एसटी कॉलनी, बाशी नाका, धाराशिव तनिश ऑर्किड, फेज-२, आर-विंग, ११०५, आळंदी आरडी., चारोली फाटा, ता. हवेली, पुणे ९-२-३४६, बिलाल नगर, देलगूर नाका, इतवारा नांदेड प्लॉट क्र.६६/२ सीटीएस क्र.९०, मयुरी रेसी, महिंद्रा शोरूमच्या मागे, छ.संभाजीनगर रोड, जालना येथे प्रकाशित केले आहे. (दैनिकातील मजकूर बातम्या बाबत संपादक सहमत असतीलच असे नाही.पीआरबी कायद्यानुसार मजकूर निवडण्याची जबाबदारी यांचेवर राहील.) कार्यकारी संपादक : बिलाल शेख मो.नं.९४२२४०४७४०

'Jagamitra' is printed by Balasaheb Jijaram Kadbane (Printer, Publisher, Owner, and Editor) at Jagamitra Offset, near Nehru Chowk, Bajiprabhu Nagar, Parli Vaijnath (Dist. Beed, Maharashtra). It is published from the following locations: 'Jagamitra' Office, Bajiprabhu Nagar, Nehru Chowk (Ground Floor), Parli Vaijnath 431515, Dist. Beed; House No. 20, Khadgaon Road, Krantinagar, near Vishwashanti Buddha Vihar, Latur; House No. 22/20, ST Colony, Bashi Naka, Dharashiv; Tanish Orchid, Phase-2, R-Wing, 1105, Alandi Road, Charoli Phata, Tal. Haveli, Pune; 9-2-346, Bilal Nagar, Delgur Naka, Itwara, Nanded; and Plot No. 66/2, CTS No. 90, Mayuri Residency, behind Mahindra Showroom, Chh. Sambhajinagar Road, Jalna. (The Editor does not necessarily agree with the content or news published in the daily; the responsibility for content selection rests with the designated person as per the PRB Act.) Executive Editor: Bilal Shaikh (Mobile No. 9422404740).

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

बद्रीनारायण घुगे (पुणे जिल्हा प्रतिनिधी)
मो.9922476927 PRGI.No.- MHMAR/26/A4099

पुणे जिल्हा आवृत्ती — बुधवार दि.१८ नोव्हेंबर २०२६ — पान नं. ५

आळंदी नगर परिषद वतीने घनकचरा व्यवस्थापन कार्यशाळा संपन्न

आळंदी । प्रतिनिधी



महाराष्ट्र शासनाच्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० अंतर्गत क्षमता बांधणी या घटकाखाली आज दिनांक १६ नोव्हेंबर २०२६ रोजी आळंदी नगरपरिषदेच्या सभागृहात घनकचरा व्यवस्थापन नियम, २०२६ च्या अनुषंगाने विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यासोबतच केंद्र शासनाच्या 'नमस्ते' योजनेअंतर्गत स्वच्छता व सफाई कर्मचाऱ्यांसाठी 'सफाई सुरक्षा प्रशिक्षण' पार पडले आणि आळंदी नगरपरिषदेतील सर्व स्वच्छता कर्मचाऱ्यांना सुरक्षा साधनांचे वितरण करण्यात आले.

राज्य अभियान संचालनालयाच्या निर्देशानुसार आयोजित या कार्यशाळेत मे. कौटिल्य मल्टिक्रियेशन प्रा.लि. (मुंबई) या संस्थेमार्फत सफाई कर्मचारी, मुकादम, घनकचरा विभाग कर्मचारी तसेच नगरपरिषदेतील सर्व विभागाच्या कर्मचाऱ्यांना घनकचरा व्यवस्थापन व कामाच्या ठिकाणच्या सुरक्षिततेबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात आले. शहराची स्वच्छता व नागरिकांचे आरोग्य अबाधित ठेवण्यासाठी अहोरात्र झटणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांचे आरोग्य सुरक्षित राहावे आणि त्यांना आधुनिक सुरक्षा साधनांचा वापर करता यावा, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

या कार्यक्रमास आळंदी नगरपरिषदेचे सन्माननीय नगराध्यक्ष, सन्माननीय उपनगराध्यक्ष, सर्व विषय समित्यांचे सन्माननीय सभापती तसेच सर्व सन्माननीय नगरसेवक व नगरसेविका उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते स्वच्छता कर्मचाऱ्यांना पीपीई किट प्रदान करून त्यांच्या कार्याचे कौतुक करण्यात आले व त्यांना सुरक्षित कामासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. याप्रसंगी नगरपरिषदेचे अधिकारी व स्वच्छता विभागाचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुनर्वापरातून साधला सौंदर्याचा नवा आविष्कार फुलेनगरमध्ये कल्पकतेतून परिसराचे सुशोभीकरण

पिंपरी । प्रतिनिधी

वारंवार कचरा साठणारी ठिकाणे (गार्बेज व्हल्नरेबल पॉइंट - GVP) स्वच्छ, सुंदर आणि आकर्षक बनविण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडून महापौर रवि लांडगे, उप महापौर शर्मिला बाबर, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, उप आयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांच्या मार्गदर्शनाखाली शहरात विविध अभिनव उपक्रम राबविण्यात येत आहेत.

याच उपक्रमांतर्गत 'ल' क्षेत्रीय कार्यालयाच्या प्रभाग क्रमांक २० मधील डी. वाय. पाटील लॉ कॉलेज, फुलेनगर येथील वारंवार कचरा साठणाऱ्या ठिकाणाचे टाकाऊ वस्तूंच्या कल्पक आणि कलात्मक पुनर्वापरातून आकर्षक स्थळात रूपांतर करण्यात आले आहे. कल्पकतेचा स्पर्श आणि सौंदर्यदृष्टीची जोड देत निरुपयोगी वस्तूंना नवे रूप बहाल करण्यात आले असून, कचऱ्याच्या जागी सौंदर्याची नवी निर्मिती साकारली आहे. या अभिनव उपक्रमातून परिसराचे रूपडे पालटण्यासोबतच पुनर्वापराचे महत्त्व आणि स्वच्छतेचा संदेशही त्यानिमित्ताने देण्यात येत आहे.

यापरिसरात यापूर्वी कचरा टाकला जात असलेल्या ठिकाणी विविध टाकाऊ वस्तूंचा सुबक आणि कलात्मक पद्धतीने वापर करण्यात आला. त्यामुळे केवळ परिसराचे सौंदर्यीकरण झाले नाही, तर कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन, पुनर्वापर आणि सार्वजनिक स्वच्छतेविषयी नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण होण्यासही मदत होणार आहे. कचरा टाकण्याच्या ठिकाणाचे सुशोभीकरण करून त्याचे सकारात्मक आणि आकर्षक जागेत रूपांतर करण्याचा हा उपक्रम विशेष ठरत आहे.

याबाबत महापौर रवि लांडगे म्हणाले, शहर स्वच्छ आणि सुंदर ठेवणे ही केवळ महापालिकेची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचेही कर्तव्य आहे. टाकाऊ वस्तूंचा कलात्मक पुनर्वापर करून वारंवार कचरा साठणाऱ्या ठिकाणांचे सुशोभीकरण करणे हा पर्यावरणपूरक आणि अभिनव उपक्रम आहे. अशा उपक्रमांमुळे स्वच्छतेसोबतच पुनर्वापराची संस्कृती विकसित होण्यास मदत होईल.

आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी म्हणाले, वारंवार कचरा साठणाऱ्या ठिकाणांचे कायमस्वरूपी स्वरूपात रूपांतर करण्यासाठी केवळ स्वच्छता पुरेशी नाही, तर त्या ठिकाणांचा सकारात्मक वापर आणि सौंदर्यीकरणही महत्त्वाचे आहे. टाकाऊ वस्तूंचा पुनर्वापर करून अशा जागांचे आकर्षक रूपांतर केल्यास नागरिकांमध्ये स्वच्छतेविषयी जाणीव निर्माण होईल. शहरातील इतर वारंवार कचरा साठणाऱ्या ठिकाणी अशा नावीन्यपूर्ण संकल्पना राबविण्यावर भर देण्यात येत आहे.

उप आयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल म्हणाले, वारंवार कचरा साठणाऱ्या ठिकाणांवर पुन्हा कचरा साचू नये, यासाठी परिसराचे सुशोभीकरण, नियमित स्वच्छता आणि नागरिकांचे सहकार्य आवश्यक आहे. टाकाऊ वस्तूंच्या कलात्मक पुनर्वापरातून स्वच्छतेचा संदेश प्रभावीपणे पोहोचविता येतो. नागरिकांनीही सार्वजनिक ठिकाणी कचरा न टाकता स्वच्छता राखण्यासाठी महापालिकेला सहकार्य करावे.

यावेळी पिंपरी चिंचवड महानगरपालिका नगरसदस्या वर्षा जगताप, आरोग्य निरीक्षक लक्ष्मण साळवे तसेच महापालिकेचे अन्य अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. टाकाऊ वस्तूंमधून साकारलेले हे सौंदर्यपूर्ण परिवर्तन शहरातील स्वच्छता मोहिमेला नवी दिशा देणारे ठरत आहे.



दिवाळी सुट्टी संपल्यानंतरही जोडून सलग सुट्ट्या घेणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कडक कारवाई करा : वाघेरे

पिंपरी । प्रतिनिधी



पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अधिकारी व कर्मचारी यांना दिवाळीची सलग पाच दिवस सुट्टी असताना सुट्टी संपल्यावरही सलग जोडून गुरुवार व शुक्रवार मनमानी पद्धतीने सुट्टी घेणाऱ्या बेजबाबदार, मस्तवाल आणि निर्ढावलेल्या अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कडक कारवाई करा, अशी मागणी माहिती अधिकार कार्यकर्ते रमेश वाघेरे यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. विजय सुर्यवंशी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

पिंपरी चिंचवड महापालिकेतील अधिकाऱ्यांना कर्मचारी यांना लाखोंच्यावर गलेलठ्ठ पगार आहे. बोनस लाखांच्या घरात आहे. त्यामुळे हे अधिकारी, कर्मचारी मस्तावाल झालेले आहेत. हे जनतेचे नोकर आहेत. हे विसरलेले आहेत. ही महापालिका करदात्यांच्या पैशावर चालते, हेही हे अधिकारी आणि कर्मचारी विसरलेले आहेत. त्यामुळे दिवाळीची सुट्टी संपल्यावर गुरुवार दिनांक १२ नोव्हेंबर २०२६ आणि शुक्रवार १३ नोव्हेंबर २०२६ रोजी मनमानी पद्धतीने सुट्टी घेतलेल्या सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांच्यावर बेजोबदारपणाचा ठपका ठेवून कडक कारवाई करा.

दिवाळीच्या पाच दिवस सुट्टी संपल्यावर गुरुवार आणि शुक्रवारी आपल्या कामासाठी महापालिकेच्या मुख्य इमारती व प्रभाग कार्यालय, कर संकलन कार्यालयात आलेल्या नागरिकांना या बेजबाबदार अधिकारी आणि कर्मचाऱ्यांमुळे नाहक त्रास सहन करावा लागला आहे. अशा बेजबाबदार अधिकारी व कर्मचारी यांच्यावर आयुक्त साहेब आपण कडक कारवाई करावी, जेणेकरून हे अधिकारी आणि कर्मचारी पुढच्या वेळी असा प्रकार करणार नाहीत, असे निवेदनात नमूद केले आहे.

पार्किंग पॉलिसीच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी 'अ' क्षेत्रीय कार्यालयात स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक

सर्व प्रभागातील नागरिकांच्या समस्यांना प्राधान्य देणार : सभापती अभिषेक बारणे

पिंपरी । प्रतिनिधी



शहरातील वाहतूक व्यवस्था सुधारण्यासाठी आणि नागरिकांना दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आज 'अ' क्षेत्रीय कार्यालयांतर्गत एक महत्त्वाची संयुक्त बैठक पार पडली. स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकित उपमहापौर शर्मिला बाबर, क्रीडा सभापती प्रमोद कुटे, नगरसेवक उत्तम केंदळे, राजू मिसाळ, बापू घोलप, अमित गावडे, सुजाता कारंडे, तसेच महापालिकेच्या विविध विभागांचे अधिकारी, दळणवळण विभाग, बीआरटीएस विभाग, वाहतूक विभाग आणि इतर संबंधित विभागांचे अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शहरात पार्किंग पॉलिसीच्या प्रभावी अंमलबजावणी संदर्भात बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. शहरातील वाहतूक व्यवस्था, पार्किंगच्या निर्माण झालेल्या समस्या, रस्त्यांवरील अडचणी तसेच नागरिकांना दररोज भेडसावणाऱ्या विविध नागरी समस्यांचा सखोल आढावा घेण्यात आला. या वाहतुकीच्या मुद्द्यासोबतच पाणीपुरवठा, वीज, आरोग्य, स्वच्छता आणि इतर सर्व महत्त्वाच्या विभागांच्या कामकाजासंदर्भातही संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करण्यात आली. नागरिकांकडून सातत्याने मांडण्यात येणाऱ्या समस्या, प्रलंबित कामे आणि आवश्यक उपाययोजनांबाबत प्रत्येक विभागाला योग्य त्या कठोर सूचना देण्यात आल्या असून, कामे वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात आले आहेत.

शहराचा सुनियोजित विकास साधणे आणि नागरिकांना दर्जेदार नागरी सुविधा उपलब्ध करून देणे हे आमचे सर्वोच्च प्राधान्य आहे. पार्किंग पॉलिसीची प्रभावी अंमलबजावणी झाल्यास शहरातील वाहतूक कोंडीची समस्या सुटण्यास मोठी मदत होईल. नागरिकांना दररोज भेडसावणाऱ्या समस्या, पाणीपुरवठा, स्वच्छता व इतर प्रश्न तातडीने मार्गी लावावेत, असे स्पष्ट निर्देश सर्व संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना दिले आहेत. प्रलंबित कामे कोणतीही कुचराई न करता वेळेत पूर्ण झाली पाहिजेत, जेणेकरून सर्वसामान्यांना त्याचा थेट फायदा होईल,

– अभिषेक बारणे – स्थायी समिती सभापती, पिंपरी चिंचवड महापालिका.

कार्तिकी यात्रा संजीवन समाधी सोहळा २०२६ च्या नियोजनाला वेग

भाविकांसाठी १,००० मोबाईल टॉयलेट, ४०० अतिरिक्त स्वच्छता कर्मचारी, १८० सीसीटीव्ही कॅमेरे, ७०० सीटीपीटी सीट्स; सर्व विभागांना ३० नोव्हेंबरपर्यंत कामे पूर्ण करण्याचे निर्देश

पिंपरी । बद्रीनारायण घुगे



श्रीक्षेत्र आळंदी येथे होणाऱ्या कार्तिकी यात्रा संजीवन समाधी सोहळा २०२६ च्या पार्श्वभूमीवर भाविकांना सुरक्षित, स्वच्छ, आरोग्यदायी व सुलभ वातावरणात दर्शन घेता यावे, तसेच यात्रा कालावधीत शहरातील वाहतूक, पाणीपुरवठा, स्वच्छता, आरोग्य व सुरक्षा व्यवस्था सक्षम राहावी, यासाठी आळंदी नगरपरिषद प्रशासनाकडून व्यापक नियोजन करण्यात येत आहे. या अनुषंगाने आज दिनांक १७ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता आळंदी नगरपरिषदेच्या सभागृहात उपविभागीय अधिकारी, खेड विभागाचे अनिल दौंडे यांच्या अध्यक्षतेखाली कार्तिकी यात्रा संजीवन समाधी सोहळा २०२६ पूर्वनियोजन बैठक पार पडली.

या बैठकीस अनिल दौंडे, उपविभागीय अधिकारी खेड, नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे, मुख्याधिकारी माधव खांडेकर, मुख विश्वस्त डॉ. भावार्थ देखने, उपनगराध्यक्ष श्रीमती सुजाता तापकीर, सभापती यात्रा व नियोजन समिती श्रीमती पूजा घुंडरे, पोलीस उपआयुक्त मारुती जगताप, विश्वस्त श्री योगी निरंजनाथ गुरु शांतिनाथ, विश्वस्त चैतन्य कबीर बुवा, वरिष्ठ पोलीस निरीक्षक आळंदी भिमा नरके, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, दिघी नितीन फटांगरे, नगरसेविका सौ साक्षी कुऱ्हाडे, नगरसेवक हेमंत उर्फ सागर कुऱ्हाडे, नगरसेवक दिनेश घुले, पक्षनेता सचिन गिलबिले, नगरसेविका खुशी बोरुंदिया, नगरसेवक सोमनाथ कुऱ्हाडे, नगरसेविका अरुणा ज्ञानेश्वर घुंडरे, नगरसेवक गोविंद उर्फ सागर कुऱ्हाडे, नगरसेवक सुरेश झोंबाडे तसेच आरोग्य, विद्युत, सार्वजनिक बांधकाम, परिवहन, पीएमपीएमएल, अन्न व औषध प्रशासन तसेच केळगाव व चऱ्होली ग्रामपंचायतींचे ग्रामसेवक व आळंदी नगरपरिषदेचे अधिकारी व कर्मचारी अधिकारी उपस्थित होते. बैठकीच्या प्रारंभी मुख्याधिकारी, आळंदी नगरपरिषद यांनी उपस्थित सर्व अधिकारी व पदाधिकाऱ्यांचे स्वागत करून कार्तिकी यात्रेच्या अनुषंगाने नगरपरिषदेमार्फत करण्यात येत असलेल्या नियोजनाची सविस्तर माहिती दिली.

माणुसकीच्या दिव्याने उजळणार दुष्काळग्रस्तांची दिवाळी

श्री ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेच्या 'एक हात मदतीचा' उपक्रमातून ५१ हजार रुपयांच्या धान्य किटचे वाटप

आळंदी देवाची । प्रतिनिधी



दिवाळीच्या आनंदोत्सवात माणुसकीचा सुगंध दरवळवत श्री ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेच्या विद्यार्थी सहाय्यक समिती च्या वतीने राबविण्यात आलेला 'एक हात मदतीचा' हा सामाजिक बांधिलकी म्हणून असलेला उपक्रम उत्साहात संपन्न झाला. दीपावलीचे औचित्य साधून मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त बांधवांना सुमारे ५१ हजार रुपये किमतीच्या दिवाळीसाठी आवश्यक असलेल्या धान्य किटसाठी निधी वाटप करण्यात आला. आनंदाच्या सणात संकटग्रस्तांच्या जीवनातही आनंदाचा प्रकाश निर्माण करण्याचा संस्थेचा हा प्रयत्न कौतुकास्पद ठरला.

श्री ज्ञानेश्वर शिक्षण संस्था संचलित श्री ज्ञानेश्वर बालक मंदिर, श्री ज्ञानेश्वर प्राथमिक विद्या मंदिर तसेच श्री ज्ञानेश्वर विद्यालय व ज्यु. कॉलेज मधील पदाधिकारी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि विद्यार्थ्यांनी यथाशक्ती आर्थिक मदत करत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. दिवाळी म्हणजे केवळ दिव्यांची रोषणाई, फराळ आणि फटाक्यांचा उत्सव नव्हे, तर दुसऱ्याच्या आयुष्यात आनंदाचा प्रकाश निर्माण करण्याची संधी आहे, हा मानवतेचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

'मदत करण्यासाठी श्रीमंत असण्याची गरज नसते, तर मन मोठे असावे लागते. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव, परोपकाराची भावना आणि समाजाप्रती जबाबदारी रुजविणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. आपल्या आनंदातील थोडासा आनंद गरजूंसोबत वाटून घेण्यातच दिवाळीचा खरा आनंद सामावलेला आहे,' असे प्रतिपादन संस्थेचे सचिव अजित वडगावकर यांनी केले. यासाठी मदत केलेल्या सर्व घटकांचे संस्थेच्या वतीने आभार मानले.

या निधी वाटप उपक्रमासाठी संस्थेचे सचिव अजित वडगावकर, विद्यालयाचे प्राचार्य किसन राठोड, उपप्राचार्य प्रशांत सोनवणे, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक प्रदीप काळे, विद्यालयाच्या व विद्यार्थी सहाय्यक समितीच्या पर्यवेक्षिका अनिता पडळकर तसेच हेमांगी उपरे, अनुजायीनी राजहंस, विठ्ठलदास गुट्टे, प्रज्ञा यादव, सूर्यकांत खुडे, उज्ज्वला कडलासकर, विद्या वाघुले, सोनाली कातोरे यांनी विशेष सहकार्य केले. तसेच मराठवाड्यातील दुष्काळग्रस्तांपर्यंत मदत पोहोचविण्यासाठी किसन राठोड, राजाभाऊ पानगावकर, इम्रान शेख, अयोध्या मुंढे आणि एस.व्ही. जाधव यांनी योगदान दिले.

पडणारा प्रत्येक थेंब जिथल्या तिथे जिरवा; भारतातील पूर आणि दुष्काळाची समस्या कायमची मिटवा!

निसर्गाचा लहरीपणा आणि मानवाचा निसर्गावरील वाढता हस्तक्षेप यामुळे आज संपूर्ण जग एका विचित्र आणि गंभीर हवामान संकटाचा सामना करत आहे. विशेषतः मराठवाडा आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचा विचार करता, पाण्याचे हे दुहेरी संकट अत्यंत चिंताजनक आणि जीवघेणे बनले आहे. कधीकाळी 'दुष्काळी प्रदेश' आणि 'टँकरवाडा' अशी ओळख असलेल्या मराठवाड्यात गेल्या काही वर्षांपासून एकाच वर्षात दोन टोकाची संकटे पाहायला मिळत आहेत. पावसाळ्यात एकाच वेळी कोसळणाऱ्या मुसळधार पावसामुळे शहरे आणि गावे पाण्याखाली जातात, ओढे-नाले तुडुंब भरून वाहतात, हातातोंडाशी आलेली पिके उद्ध्वस्त होतात आणि 'ओल्या दुष्काळाचे' सावट पसरते. याउलट, पावसाळा संपून अवघे काही महिने उलटताच विहिरी तळ गाठतात, धरणे आटतात आणि उन्हाळ्यात घोटभर पाण्यासाठी नागरिकांना वणवण भटकावे लागते. एकाच वर्षात अतिवृष्टी आणि तीव्र पाणीटंचाई या दोन्ही समस्या निर्माण होण्यामागे एकच मूळ कारण आहे-ते म्हणजे पावसाचे पाणी जमिनीत न मुरता वाहून जाणे. मराठवाडा आणि छत्रपती संभाजीनगरची बदलती जलस्थिती

भौगोलिकदृष्ट्या मराठवाड्याचे सरासरी वार्षिक पर्जन्यमान सुमारे ७०० ते ७५० मिमी इतके आहे. मात्र, जागतिक हवामान बदलामुळे पावसाचे वेळापत्रक पूर्णपणे कोलमडले आहे. पूर्वी चार महिने संततधार बरसणारा पाऊस आता केवळ काही दिवसांत आणि काही तासांतच १०० ते १५० मिमी इतका (ढगफुटीसदृश अतिवृष्टी) कोसळत आहे. अतिवृष्टी आणि महापुराचे थैमान: मुसळधार पावसामुळे गोदावरी, पूर्णा, दुधना, शिवना या नद्यांसह स्थानिक ओढे-नाले तुडुंब भरून वाहतात. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील कन्नड, सिल्लोड, वैजापूर, गंगापूर, पैठण यांसारख्या तालुक्यांमध्ये अतिवृष्टीमुळे लाखो हेक्टरवरील खरिपाची पिके, फळबागा आणि शेतकऱ्यांची अत्यंत सुपीक काळी माती वाहून गेल्याची उदाहरणे ताजी आहेत.

पाणीटंचाईचे भीषण वास्तव: दुसरीकडे, पावसाचे हे कोट्यवधी लिटर पाणी वाहून समुद्राला जाऊन मिळते आणि पावसाळा संपताच भूजलाची पातळी झपाट्याने खाली जाते. मे महिन्याच्या अखेरीस छत्रपती संभाजीनगरसह संपूर्ण मराठवाड्यात शेकडो गावे, वाड्या-वस्त्या आणि शहरातील अनेक वसाहतींना टँकरने पाणीपुरवठा करावा लागतो. केवळ जायकवाडीसारख्या मोठ्या धरणांवर अवलंबून राहण्यापलीकडे जाऊन स्थानिक पातळीवर भूजल साठा वाढवणे ही आज काळाची सर्वात मोठी गरज बनली आहे.

वेगवान शहरीकरण आणि काँक्रीटीकरणाचे दुष्परिणाम

छत्रपती संभाजीनगर शहराचा औद्योगिक आणि नागरी विस्तार अत्यंत वेगाने होत आहे. बीड बायपास, वाळूज, सातारा-देवळाई, चिकलठाणा, शेंद्रा-बिडकीन (ऑरिक सिटी) या भागांत मोठ्या प्रमाणावर नवीन वसाहती, गृहप्रकल्प आणि औद्योगिक क्षेत्रे उभी राहिली आहेत. विकासाच्या या प्रक्रियेत सिमेंटचे रुंद रस्ते, पदपथांवरील पेव्हर ब्लॉक्स आणि काँक्रीटची जंगले उभी राहिली, परंतु पावसाचे पाणी जमिनीत मुरण्यासाठी मोकळी जागाच शिल्लक राहिली नाही.

परिणामी, शहरात तासभर जरी जोरदार पाऊस पडला तरी सखल भागांत, मुख्य चौकांमध्ये आणि नागरी वसाहतींमध्ये गुडघाभर ते कमरेइतके पाणी साचते. वाहने पाण्यात बुडतात आणि जनजीवन विस्कळीत होते. आपण ज्याला 'अतिवृष्टीचे संकट' म्हणतो, ते प्रत्यक्षात खाम, सुखना यांसारख्या नैसर्गिक नद्या-नाल्यांवरील अतिक्रमणे, नाल्यांचे आकुंचन आणि पाण्याला जमिनीत जाण्याचा मार्ग बंद केल्यामुळे ओढवलेले मानवनिर्मित संकट आहे.

ग्रामीण भागातील आव्हाने आणि भूगर्भातील खडक रचना

ग्रामीण भागातील जलसंकट अधिक गुंतागुंतीचे आहे. मराठवाड्याच्या भूगर्भात प्रामुख्याने कठीण काळा पाषाण (इरीरश्रीं ठेलज्ञ) आढळतो. या कठीण खडकातून पावसाचे पाणी नैसर्गिकरीत्या जमिनीत मुरण्याचा वेग अत्यंत कमी (केवळ ५ ते ८ टक्के) असतो. त्यातच डोंगरउतारावरील बेसुमार जंगलतोड, नद्या-नाल्यांतील अनिर्बंध वाळू उपसा आणि ऐतिहासिक 'नहर-ए-अंबरी'सारख्या पारंपरिक जलव्यवस्थापनाकडे झालेले दुर्लक्ष यामुळे पावसाचे पाणी जमिनीत न मुरता वेगाने वाहून जाते. जमिनीतील पाण्याचा उपसा मात्र अमर्याद सुरू आहे. आज ग्रामीण भागात ६०० ते ८०० फूट खोल बोअरवेल घेऊनही उन्हाळ्यात पाणी लागत नाही, ही अत्यंत चिंताजनक बाब आहे.

जिथल्या तिथे पाणी जिरवणे' हाच एकमेव शाश्वत उपाय

पाण्याच्या या दुहेरी संकटावर (जास्त पाणी आणि कमी पाणी) मात करण्यासाठी बाह्य व खर्चिक उपाययोजनांपेक्षा पाणी अडवा, जिथल्या तिथे जिरवा हा मूलमंत्र प्रत्यक्ष कृतीत आणणे ही काळाची गरज आहे. गावातील आणि शहरातील पावसाचे पाणी जर त्या त्या परिसरातच जमिनीत मुरवले, तर एकाच वेळी दोन मोठे क्रांतिकारी बदल घडतात:

१. अतिवृष्टी व पुराचा धोका कायमचा टळतो: पावसाचे पाणी रस्त्यांवरून आणि शेतांतून वेगाने वाहून जाण्याऐवजी जागेवरच जमिनीत मुरल्याने नाले, ओढे आणि नद्यांवरील पाण्याचा अतिरिक्त ताण कमी होतो. यामुळे शहरांतील वसाहतींमध्ये पाणी शिरण्याची आणि ग्रामीण भागात नद्यांना येणाऱ्या महापुराची तीव्रता मोठ्या प्रमाणात नियंत्रणात येते.

२. दुष्काळ व टँकरमुक्त भविष्याची हमी: जमिनीत मुरलेले पाणी ही आपल्या भविष्याची सर्वात सुरक्षित 'जल बँक' असते. यामुळे भूजलाची पातळी झपाट्याने वाढते. परिणामी, गावातील विहिरी, कूपनलिका (बोअरवेल), बारवा आणि पाझर तलाव उन्हाळ्यातही जिवंत राहतात. 'टँकरमुक्त मराठवाडा' आणि 'पाणीटंचाईमुक्त शहर' हे स्वप्न केवळ भूजल पुनर्भरणातूनच साकार होऊ शकते.

हरी आणि ग्रामीण स्तरावर नेमके कोणते ठोस उपाय करावेत?

जलसंधारण ही केवळ शासकीय कागदपत्रांपुरती योजना न राहता ती व्यापक लोकचळवळ बनली पाहिजे. त्यासाठी पुढील अत्यंत व्यावहारिक आणि प्रभावी पावले उचलणे आवश्यक आहे:



खोलगट भागांत मोठ्या शोषखड्ड्यांची निर्मिती: गावांत आणि शहरांत ज्या ठिकाणी नैसर्गिकरीत्या खोलगट भाग आहे किंवा पावसाळ्यात जिथे पाणी साचते, अशा ठिकाणी मोठे खड्डे खोदून त्यामध्ये मोठे दगड, गिट्टी आणि वाळूचे (रेतीचे) थर भरून पावसाचे पाणी थेट जमिनीत जिरवता येते. या नैसर्गिक गाळणीमुळे स्वच्छ पाणी भूगर्भात जाते आणि सखल भागातील पाणी साचण्याची समस्या कायमची सुटते.

रस्त्याकडील नाल्यांचे शास्त्रोक्त नियोजन: आज रस्त्याच्या बाजूला बांधल्या जाणाऱ्या सिमेंटच्या बंदिस्त नाल्यांमुळे सर्व पाणी थेट नदीत किंवा शहराबाहेर वाहून जाते. त्याऐवजी नाल्यांची रचना अशी असावी की ज्या ठिकाणी नाल्यांचे पाणी एकत्र येते, तिथेच ठराविक अंतरावर मोठे शोषखड्डे करून ते पाणी जमिनीत जिरवले जाईल. याचा दुहेरी फायदा होईल-रस्त्यांवर पाणी साचणार नाहीच, शिवाय रस्त्याच्या कडेला लावलेल्या झाडांना वर्षभर नैसर्गिक ओलावा मिळून त्यांना टँकरने पाणी घालण्याचा शासनाचा कोट्यवधी रुपयांचा खर्चही वाचेल.

गल्लीबोळ व मोठ्या इमारतींतील लाखो लिटर पाणी वाचवा: आज शहरातील प्रत्येक गल्लीतून वाहून जाणारे पाणी तसेच मोठमोठी शासकीय व खाजगी कार्यालये, शाळा, महाविद्यालये, रुग्णालये, औद्योगिक वसाहती आणि गृहनिर्माण संस्थांच्या (सोसायटी) छतावरील लाखो लिटर शुद्ध पावसाचे पाणी नाल्यावाटे मैलोन्मैल दूर वाहून जाते. एका १००० चौ. फुटांच्या छतावरून एका पावसाळ्यात सुमारे ६०,००० ते ७०,००० लिटर पाणी जमा होऊ शकते. हेच पाणी जर 'रेन वॉटर हार्वेस्टिंग' आणि बोअरवेल पुनर्भरणाद्वारे जिथल्या तिथे अडवून जिरवले, तर उन्हाळ्यात तळपत राहणारी शहरे आणि गावे नक्कीच हिरवीगार व हरित होतील.

ग्रामीण भागातील जलसंधारण आणि लोकसहभाग: शेतातील पाणी शेतातच मुरवण्यासाठी शेततळी, बांधबंदिस्ती, डोंगरउतारावर समतल चर (उउढ) आणि नाला बंडिंगची कामे लोकसहभागातून करणे आवश्यक आहे. 'गाळमुक्त धरण आणि गाळयुक्त शिवार' या मोहिमेतून गावच्या तलावांतील गाळ काढून त्यांची साठवण क्षमता वाढवावी, ज्यामुळे कठीण काळ्या पाषाणातील भेगांमधून भूजल पुनर्भरण होईल. तसेच ग्रामीण भागातील प्रत्येक घराच्या परसबागेत सांडपाणी आणि पावसाच्या पाण्यासाठी शोषखड्डे तयार करणे बंधनकारक करावे.

उपसंहार: लोकसहभाग आणि शासकीय इच्छाशक्तीची गरज

हे सर्व उपाय जर आपण प्रामाणिकपणे आणि शास्त्रोक्त पद्धतीने राबवले, तर गावे आणि उन्हाळ्यात तळपत राहणारी शहरे पुन्हा एकदा हरित होतीलच, शिवाय पाण्याची मुख्य समस्या कायमची कमी होईल, हे मी अत्यंत ठामपणे सांगू शकतो. निसर्ग आपल्याला दरवर्षी पुरेसे पाणी देतो, पण त्याचे योग्य व्यवस्थापन करण्यात आपण कमी पडतो. पाऊस पाडणे आपल्या हातात नसले, तरी आकाशातून पडलेला प्रत्येक थेंब जिथल्या तिथे जमिनीत जिरवणे आपल्या हातात नक्कीच आहे.

फक्त यासाठी सर्व भारतीयांनी स्वतः पुढाकार घेणे आणि शासनाने धोरणात्मक व आर्थिक पाठबळ देऊन खंबीरपणे पाठीशी राहणे गरजेचे आहे. जलसंधारण हे प्रत्येक सुजाण नागरिकाचे नैतिक कर्तव्य आहे. आज आपण पावसाच्या पाण्याचा सन्मान करून ते जमिनीच्या पोटात साठवले, तरच उद्याचा मराठवाडा आणि संपूर्ण भारत पूर आणि दुष्काळाच्या संकटातून मुक्त होऊन खऱ्या अर्थाने सुजलाम् सुफलाम् होईल!

लेखक: प्रा. ज्ञानेश्वर पंडितराव घुले
(अध्यक्ष, सरस्वती सेवाभावी बहुउद्देशीय संस्था / जिल्हा प्रतिनिधी, दैनिक जगमित्र, छत्रपती संभाजीनगर)
मो.न. : ९८५०८०२०२२